७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची
दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
शुक्रवार, दि. १५ मे २०२६
www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews
संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १३९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

# महाराष्ट्रातील मुलांना डावलण्यासाठीच 'NEET'

## राज ठाकरेंची टीका : धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा घ्या; पंतप्रधानांकडे मागणी



**मुंबई (दै. संध्या)**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी 'NEET' परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि त्यानंतर निर्माण झालेल्या गोंधळावरून केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. 'NEET' परीक्षेचा पेपर लाखो रुपयांना विकला गेला आणि त्याची मुळे महाराष्ट्रात सापडल्याचे समोर येत असताना, केंद्र सरकारने केवळ परीक्षा रद्द करून आणि सीबीआय चौकशी जाहीर करून जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप त्यांनी केला. या संपूर्ण प्रकारामुळे 22 लाख विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांचे भविष्य अधांतरी राहिल्याचे सांगत त्यांनी सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

राज ठाकरे यांनी म्हटले की, 'NEET' परीक्षा सुरू झाल्यापासूनच त्यांनी त्याला विरोध केला होता. 2016 मध्ये देशभर एकच वैद्यकीय प्रवेश परीक्षा लागू करण्यामागे केंद्र सरकारचा केंद्रीकरणाचा हट्ट होता, असा आरोप त्यांनी केला. या पद्धतीमुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम विद्यार्थ्यांना महागड्या कोचिंग क्लासेसचा फायदा होईल आणि ग्रामीण तसेच मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांचे नुकसान होईल, अशी भीती त्यांनी यापूर्वीच व्यक्त केली होती. आता समोर आलेल्या पेपरफुटीच्या प्रकारामुळे त्यांची भीती खरी ठरल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी कोचिंग क्लासेसच्या जाळ्यावरही गंभीर प्रश्न उपस्थित केले. उत्तर भारतात मोठ्या प्रमाणावर कोचिंग उद्योग उभा राहिला असून, त्यांच्याकडे आर्थिक ताकद आणि व्यवस्था वाकवण्याची क्षमता असल्याचा आरोप त्यांनी केला. महाराष्ट्र आणि दक्षिण भारतातील राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय महाविद्यालये असताना, उत्तर भारतातील विद्यार्थ्यांना या राज्यांत प्रवेश मिळवून देण्यासाठीच 'NEET' सारखी परीक्षा लादण्यात आली, असा दावाही त्यांनी केला. तामिळनाडूसह दक्षिणेकडील अनेक राज्यांनी या परीक्षेला विरोध केल्याचे त्यांनी नमूद केले. राज ठाकरे यांनी 'NEET' परीक्षेतील आधीच्या गोंधळांचाही उल्लेख केला. काही विद्यार्थ्यांना 720 पैकी 720 गुण मिळणे, ग्रेस मार्क्स देण्याचे प्रकार आणि पेपरफुटीच्या घटना या सर्व गोष्टींमुळे परीक्षेची विश्वासार्हता संपल्याचा आरोप त्यांनी केला. ज्याच्याकडे व्यवस्था वाकवण्याची ताकद आहे, त्यालाच या व्यवस्थेत फायदा मिळतो, असे म्हणत त्यांनी केंद्र सरकारवर अप्रत्यक्षपणे टीका केली. याचबरोबर, अशा पद्धतीने वैद्यकीय शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या डॉक्टरांवर समाजाने विश्वास ठेवायचा का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावरही त्यांनी निशाणा साधला. त्यांच्या कार्यकाळात 'NEET' संदर्भातील अनेक वाद आणि गोंधळ झाले, तरीही त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नसल्याबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. 22 लाख विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्या शिक्षण मंत्र्यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा, अशी मागणी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली. यापूर्वीही 'NEET' संदर्भातील समस्यांवर आपण थेट पंतप्रधानांशी चर्चा केली होती, मात्र कायमस्वरूपी उपाय करण्यात सरकार अपयशी ठरल्याचे त्यांनी म्हटले. राज ठाकरे यांनी महाराष्ट्र सरकारलाही थेट आवाहन केले. महाराष्ट्रातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये मराठी विद्यार्थ्यांनाच संधी मिळणार नसेल, तर सरकारचा उपयोग काय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. केंद्र सरकारच्या प्रत्येक निर्णयाला पाठिंबा देण्यापेक्षा राज्याच्या हिताची ठाम भूमिका घ्यावी, असे त्यांनी राज्यातील मंत्र्यांना सुनावले.

## महाराष्ट्रात १.१४ लाख कोटींची गुंतवणूक; ८,००० जणांना मिळणार रोजगार!



**मुंबई (दै. संध्या)**


राज्याच्या औद्योगिक आणि तंत्रज्ञान क्षेत्राला मोठी गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्योग विभाग आणि 'एएम इंटेलिजन्स लॅब्ज प्रायव्हेट लिमिटेड' समवेत १ लाख १४ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार आज झाला. मुख्यमंत्री समिती कक्षात झालेल्या या कराराच्या वेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी. अन्बळगण, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, सहसचिव डॉ.श्रीकांत पुलकुंडवार, सहसचिव लक्ष्मीकांत ढोके, एएम इंटेलिजन्स लॅब्जचे अध्यक्ष अनिल चलमलाशेट्टी, संचालक मौर्य पायदा, उपाध्यक्ष पंकज कुमार आदी उपस्थित होते. या प्रकल्पामुळे राज्यात तब्बल ८ हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे. या सामंजस्य करारामुळे मुंबई महानगर प्रदेशात (MMR) 'इंटिग्रेटेड ग्रीन डेटा सेंटर पार्क' आणि 'एआय कॉम्प्युट हब' उभारला जाणार आहे. यासाठी कंपनी १,१४,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. हा प्रकल्प पूर्णपणे अक्षय ऊर्जेवर आधारित असेल, ज्यामुळे पर्यावरणाचे रक्षणही होईल.उच्च तंत्रज्ञान क्षेत्रात कुशल आणि निमकुशल अशा ८ हजार तरुणांना रोजगाराची संधी मिळणार आहे. यामध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर्स, डेटा सायंटिस्ट आणि ऑपरेशन्स टीमचा समावेश असेल. प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीत सुमारे २ हजार अतिरिक्त रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. हा प्रकल्प ५०० मेगावॅट क्षमतेचा असून यामध्ये २,५०,००० उच्च क्षमतेचे 'एआय चिपसेट्स' वापरले जातील.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

**ढिंग-टांग**




## मुख्यमंत्री फडणवीसांची बाइकवरून एन्ट्री, पण पीयुसीची मुदत संपलेली



**मुंबई (दै. संध्या)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी स्वतः केवळ दोन गाड्यांचा ताफा घेऊन प्रवास करत इंधन बचतीचा वस्तुपाठ घालून दिला होता. याला प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनीही आज दुचाकीवरून विधानभवन गाठले. मात्र मुख्यमंत्री ज्या दुचाकीवरून आले, त्या दुचाकीची पीयूसी संपलेली असल्याची टीका काँग्रेसने केली आहे. खासदार वर्षा गायकवाड यांनी यासंदर्भातील कागदपत्रे समोर आणली आहे. तर काँग्रेसच्या या टीकेवर भाजपकडून खुलासा करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज स्वतः 'रॉयल एनफिल्ड ३५०' ही दुचाकी चालवत विधानभवनात दाखल झाले. विशेष म्हणजे, त्यांच्या सुरक्षेसाठी तैनात असलेला ताफादेखील यावेळी आलिशान गाड्यांऐवजी दुचाकीवरूनच प्रवास करताना दिसला. मुख्यमंत्र्यांच्या या अनोख्या एन्ट्रीची विधानभवन परिसरात मोठी चर्चा झाली. मात्र, विरोधकांनी याला 'स्टंटबाजी' म्हणत टीका करण्यास वेळ लावला नाही. मुंबईतील काँग्रेस नेत्या आणि खासदार वर्षा गायकवाड यांनी मुख्यमंत्र्यांच्या या एन्ट्रीतील मोठी त्रुटी शोधून काढली आहे. ज्या बुलेटवरून मुख्यमंत्री विधानभवनात आले, त्या दुचाकीचे 'प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र' म्हणजेच 'पीयूसी'ची मुदत संपल्याचे कागदपत्र त्यांनी सोशल मीडियावर शेअर केले आहे. वर्षा गायकवाड यांनी आपल्या ट्विटमध्ये मुख्यमंत्र्यांवर खोचक शब्दांत निशाणा साधला. काही दिवसांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधींवर टीका करताना "राजकारणातील एक्स्पायर्ड माल" असा शब्दप्रयोग केला होता. तोच धागा पकडत वर्षा गायकवाड यांनी मुख्यमंत्री फडणवीसांवर निशाणा साधला आहे.

# निवडणुका संपल्यावरच सरकारला गांभीर्य का सुचले?

## सर्वपक्षीय बैठकीत पंतप्रधानांनीही यावे- शरद पवार; मुख्यमंत्र्यांचेही टोचले कान



**पुणे (दै. संध्या)**

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेत देशातील सध्याच्या परिस्थितीवर भाष्य केले आहे. तसेच केंद्र सरकारवर त्यांच्या सध्याच्या भूमिकेवरून फटकारले आहे. यावेळी बोलताना शरद पवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या संदर्भात वापरलेल्या भाषेचाही निषेध केला आहे.

शरद पवार म्हणाले, परिस्थिती गंभीर आहे आणि अशा वेळेला देशाच्या सगळ्या नेत्यांची बैठक बोलवावी आणि त्याला प्रधानमंत्र्यांनी स्वतः हजर राहावे. याच्या आधी गेल्या 3-4 वर्षात सर्व पक्षीय बैठका या झाल्या पण त्यातील एकाही बैठकीत पंतप्रधान नव्हते. पण एकंदर अशी स्थिती गंभीर आहे असे सांगण्याचे काम मुख्यमंत्री प्रधानमंत्री करत आहेत, तर तितक्याच गांभीर्याने सगळ्यांनी मिळून बैठक घ्यावी.

पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, आज मी सकाळपासून टीव्हीवर बघतोय कोणी मोटारसायकलवरुन जात आहे, कोणी चालत जात आहे, एकाने तर जाहीर केले की मी मंत्री आहे आणि माझ्या गाड्या मी कमी केल्या. त्या 17 होत्या आता 17 वरून 8 वर आलो आहे. मला तर धक्काच बसला की 17 गाड्या होत्या आणि कमी केल्यानंतर 8 वर आणल्या. याचा अर्थ या सगळ्यांचा बघण्याचा दृष्टिकोण गांभीर्याचा असला पाहिजे. अशी स्थिती या आधी देशात झाली नव्हती असे नाही, पण ठीक आहे.

शरद पवार म्हणाले, या वेळेला मुख्यमंत्री आणि अन्य मंत्र्यांनी सुद्धा आपली भाषा ही व्यवस्थित वापरली पाहिजे. राहुल गांधींच्या संबंधी मुख्यमंत्र्यांनी जे शब्द वापरले ते अयोग्य होते. राहुल गांधी हे विरोधी पक्ष नेते आहेत आणि तेही संसदेत. विरोधी पक्ष नेता हे संवैधानिक पद आहे आणि ते लोकांमधून येत आहे. त्यामुळे अशी भाषा या पदावर असलेल्या व्यक्तीच्या संबंधी वापरणे हे चुकीचे आहे. या संदर्भात आणखीन मला काही बोलायचे नाही.

रुपया खाली येत आहे आणि युद्धजन्य परिस्थिती आहे, यावर बोलताना शरद पवार म्हणाले, रुपया खाली का येतो, याचा विचार केला पाहिजे. आज इराणचा जो विषय आहे त्याचा परिणाम नक्कीच आहे. पण हा परिणाम तेवढा आहे का? निवडणुकीचे निकाल लागून गेले आणि त्यानंतर केंद्र सरकारने हे सगळे निर्णय घेतले. निवडणुका सुरू होते तेव्हा याचे गांभीर्य नव्हते आणि याची जनतेत जागृती करावी असे वाटले नाही.

पंतप्रधान सोमनाथच्या मंदिराच्या तिथे गेले, त्याचे काही नाही. पण तिथे जाऊन जे केले, विमान उडवले, 6 विमाने त्या ठिकाणी घेऊन शो केला. परिस्थिती गंभीर आहे तर सगळ्या पातळीवर दाखवली पाहिजे. सोनं खरेदी करू नका हे सांगणे याचा अर्थ एकच आहे की आपल्या रुपयाची जी वॅल्यू आहे ती घसरू द्यायची नाही. हा निर्णय चुकीचा आहे असे मी म्हणत नाही. पण एका बाजूला हे म्हणायचे आणि दुसऱ्या बाजूला वेगळेच सुरू आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांना पहिलाच धक्का : विधान परिषद डावलल्याची नाराजी

# आनंद परांजपेंचा राष्ट्रवादीच्या सर्व पदांचा राजीनामा



**मुंबई (दै. संध्या)**

अजित पवारांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्षपद आणि राज्याचे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारून त्यांचा राजकीय वारसा समर्थपणे पुढे नेण्यास सुरुवात केली असली, तरी पक्षात सध्या अंतर्गत राजकारणाला वेग आल्याचे दिसत आहे. काही दिवसांपूर्वीच प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी शरद पवारांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले होते. अशातच आता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस आणि ठाणे समन्वयक आनंद परांजपे यांनी आपल्या सर्व पदांचा राजीनामा पत्राद्वारे थेट सुनेत्रा पवारांकडे सोपवल्याने खळबळ उडाली आहे. नुकत्याच झालेल्या विधान परिषद निवडणुकीच्या उमेदवारीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी चढाओढ पाहायला मिळाली. त्यात पक्षाने झिशान सिद्दीकी यांना संधी दिल्याने ज्येष्ठ नेते आनंद परांजपे नाराज असल्याचे बोलले जात होते. आता त्याचे पडसाद उमटले आहेत. आनंद परांजपे यांनी त्यांच्या राजीनाम्याच्या पत्रात लिहिले की, मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सरचिटणीस तथा प्रवक्ता महाराष्ट्र प्रदेश, समन्वयक ठाणे व पालघर (जिल्हा) व पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत आहे. आजपर्यंत पक्षाने माझ्यावर विश्वास दाखवून पक्ष संघटनेमध्ये अनेक जबाबदाऱ्या दिल्या. त्याबद्दल मी पक्षाचा शतशः आभारी आहे, तरी माझा राजीनामा आपण स्वीकारावा ही नम्र विनंती, अशा मोजक्या शब्दांत त्यांनी आपला राजीनामा लिहिला आहे. त्यांच्या राजीनाम्याने पक्षाला मोठा धक्का बसला आहे. सोशल मीडियावर आपल्या भावना व्यक्त करताना आनंद परांजपे म्हणाले, मनात अनेक भावना दाटून आल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामधील माझा 14 वर्षांचा प्रवास, सर्व नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे मिळालेले प्रेम आणि विश्वास कायम स्मरणात राहील. आज अत्यंत जड अंतःकरणाने हा प्रवास इथेच संपवून नव्या वाटेवर पाऊल टाकून नवीन प्रवासाची सुरुवात करीत आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

नुकत्याच पार पडलेल्या विधान परिषद निवडणुकीच्या उमेदवारीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी चढाओढ पाहायला मिळाली, ज्यात पक्षाने झिशान सिद्दीकी यांना संधी दिल्याने ज्येष्ठ नेते आनंद परांजपे नाराज असल्याचे बोलले जात होते. यापूर्वी राज्यसभा आणि आता विधान परिषद अशा दोन्ही महत्त्वपूर्ण निवडणुकांमध्ये संधी नाकारली गेल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून ते पक्षात डावलले गेल्याची भावना राजकीय वर्तुळात होती. याच पार्श्वभूमीवर आपली नाराजी व्यक्त करत अखेर त्यांनी आज आपल्या पदाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर येत आहे.

### एकनाथ शिंदेंची घेतली दोनवेळा भेट

आनंद परांजपे आता पुन्हा शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली असून, गेल्या काही दिवसांत त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दोनदा भेट घेतल्याने या घरवापसीच्या चर्चांना अधिक बळ मिळाले आहे. मूळचे शिवसैनिक असलेले परांजपे यांनी शिवसेना एकसंघ असताना पक्ष सोडून राष्ट्रवादीत प्रवेश केला होता, मात्र आता बदललेल्या राजकीय परिस्थितीत ते पुन्हा स्वगृही परतण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.



## संपादकीय

# शहरांच्या भिंती अशा चित्र-विचित्र रंगतात, त्यामागच्या कहाण्या...

जोना इथे पडीक असायचा. ऑस्ट्रेलियातल्या ॲडलेड या आमच्या शहरात दुर्लक्षित झालेल्या जुन्या प्रॉपर्टीच्या मागे त्याला मोकळं रान मिळायचं. दोन वेळा तिथे ग्राफिटी केल्यानंतर शिक्षा म्हणून नगरपालिकेनं त्याला ती पुसायला लावली. जोनासारख्या भटक्या दिलखुलास तरुणासाठी अशा रितीनं पकडलं जाणं आणि आपली कारागिरी पुसली जाणं हे भलतंच नामुष्कीचं होतं. अमेरिकेत १९६० मध्ये डॅरील मॅक रे उर्फ कॉर्नब्रेड या तरुणाने पहिल्यांदा मॉर्डन ग्राफिटी करायला सुरुवात केली. त्याला कॉर्नब्रेड हे नाव कसं पडलं याची अजून एक रोचक कहाणी आहे. हा डॅरील सुधारगृहात असताना त्याला त्याच्या आजीच्या हातच्या कॉर्नब्रेडची आठवण येई. तिथल्या स्वयंपाक्याकडे तो सतत कॉर्नब्रेडची मागणी करत असे. मग त्याने स्वत:चं ते टोपण नावच करून टाकलं. हे नाव तो ग्राफिटीमधल्या टॅगिंग प्रकारासाठी वापरत असे. थोडा वयात आल्यावर तो सिंथियाच्या प्रेमात पडला आणि कॉर्नब्रेड लव्हज सिंथिया असा मेसेज त्याच्या ग्राफिटीमधून सर्वत्र भिंतींवर गिरवू लागला. अतृप्त भावना, स्वातंत्र्याची आस आणि उन्मादातला आनंद असं बहुदा ग्राफिटीच्या मुळाशी दिसून येतं असं मानसोपचार तज्ज्ञ सांगतात. तर अशा ग्राफिटीवीरांना लगाम घालण्यासाठी खट्याळ मुलालाच वर्गप्रमुख केल्याप्रमाणे तेव्हाच्या महापौराने ग्राफिटीकडून म्युरल्सकडे अशा संघटनेचं अध्यक्षपदच कॉर्नब्रेडला दिलं. मग त्यानं ते काम हिरिरीने केलं. आज तो तरुणांचा दिशादर्शक आणि एक वक्ता म्हणून काम करतो. या ग्राफिटीचे पडसाद जगभरात दिसतात. ऑस्ट्रेलियात स्प्रे पेंटिंगची बाटली घेऊन जिथे कोणी पोचू शकणार नाही अशा उंचीवर, अंधाऱ्या गल्लीत, जुन्या दुर्लक्षित जागांमध्ये असे उद्योग अनेक मंडळी करताना दिसतात. ज्या दुकानांमध्ये अशा बाटल्या विकल्या जातात त्यांना चक्क कुलूप घातलं जातं. त्यामुळे या बाटल्या पळवल्या जात नाहीत. तरीदेखील मेलबर्नच्या अगदी शहराच्या मधोमध असलेल्या काही गल्ल्या तर केवळ ग्राफिटीसाठीच प्रसिद्ध आहेत. इथली एसीडीसी लेन ही इथल्या प्रसिद्ध रॉकबॅण्डच्या नावाने ओळखली जाते. कारण इथे बहुतांशी म्युझिक म्युरल्स केली जातात. होईजर लेनमध्ये राजकीय भाष्य करणारी ग्राफिटी दिसते. १९८०च्या सुमारास जेव्हा नुसती ग्राफिटी बंद होऊन त्यात कलात्मकता आली आणि ग्राफिटीचा बाज तसाच ठेवून म्युरल्स होऊ लागली तेव्हा तिथे प्रवाशांचा ओघ सुरू झाला. मग राजकारण्यांनीदेखील याचं महत्त्व ओळखलं. मॉडर्न ग्राफिटी रंगीबेरंगी असते. त्यात थ्रो अप, थ्रीडी असे अनेक प्रकार असतात. काही ग्राफिटी आर्टिस्ट ग्राफिटीच्या चित्रांचं प्रदर्शन भरवतात. पब्ज, व्यायामशाळा, मोठी पाण्याची टाकी अशा ठिकाणी तुम्हाला ग्राफिटी करून हवी असेल तर त्याचं रितसर कंत्राटपण घेतात. आपल्याकडे पुण्यासारख्या गजबजलेल्या शहरात गिरगोट्या असलेल्या कित्येक भिंतींचं रूपांतर उत्स्फूर्त स्वयंसेवकांनी वेधक चित्रांमध्ये केलेलं बघितल्यावर डोळे आणि मन दोन्ही निवतं. आज



जोनाच्या ग्राफिटीची बातमी पुन्हा वाचली. त्याच्या घरची परिस्थिती सध्या ठीक नाहीये!

## संस्कृत सुभाषित

दुरधीता विषं विद्या, अजीर्णे भोजनं विषम्।
विषं गोष्ठी दारिद्रस्य, वृद्धस्म तरुणी विषम्।

अर्थ – योग्य प्रकारे न ग्रहण केलेली विद्या, अजीर्ण झाल्यावरही सेवन केलेले अन्न, दरिद्री माणसाने पोकळ गप्पागोष्टीत व्यर्थ वेळ घालवणे आणि वृद्धापकाळात तरुण स्त्रीचे प्रियाराधन या गोष्टी विष आहेत.

## गुरु वचन

### आईच्या संरक्षणासाठी जीव दिला

मनुष्याच्या विकासात आई–वडिलांची महत्वाची भूमिका असते. ते मुलांना वाढवतात व त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास सक्षम बनवतात. तसेच मरेपर्यंत आपल्या मुलांच्या कल्याणाचीच प्रार्थना करतात.

जगातील सर्व देवता, पैगंबर, साधु–संत व महापुरुषांनी आई–वडिलांच्या सेवेस पुण्य कर्म संबोधले आहे. भगवान बुद्धांनी देखील या सत्याचा अनुभव केला होता म्हणून त्यांनी जीवनात आई–वडिलांना महत्वपूर्ण स्थान दिले. आपल्या उपदेशात ते नेहमी आई–वडिलांची सेवा करण्यास सांगत होते. बौद्ध धर्माचा ग्रंथ सुत्तानिपातच्या पराभव सुत्तात भगवान बुद्धांनी देवास उपदेश देत सांगितले आहे की, जो व्यक्ती आपल्या आई–वडिलांचा सांभाळ किंवा पालन–पोषण करत नाही, त्याचा नाश निश्चित असतो. या ग्रंथाच्या महामंगल सुत्तात बुद्ध म्हणतात की, आई–वडिलांची सेवा करणे सर्वोच्च मंगल कार्य आहे. धम्मिक सुत्तात गृहस्थ धर्माची व्याख्या करत ते सांगतात की, जो धर्मानुसार आई–वडिलांची सेवा करतो, तो स्वयंप्रभ नावाच्या देवलोकात उत्पन्न होतो.

बौद्ध धर्माचा प्रसिद्ध ग्रंथ धम्मपदात बुद्ध सांगतात, जगात आई–वडिलांची सेवा सुखकर असते. बुद्धांनुसार आई–वडिलांचे स्थान सर्वोच्च असते. आई–वडिल आपल्या मुलांचे पालनपोषण करुन मोठे करतात, त्यांना जीवनात अग्रेसर राहण्यासाठी समर्थ बनवतात व जीवनभर त्यांना आशिर्वाद देतात. आई–वडिल वृद्ध व असहाय झाल्यावर त्यांची सेवा करणे मुलांचे नैतिक कर्तव्य असते. जर त्यांनी नैतिक कर्तव्याचे पालन केले नाही तर ते अधर्माचे भागीदार होतात व समाजात त्यांची निंदा होते.

बुद्ध याबाबतीत खुप संवेदनशील होते म्हणून त्यांनी व्यवस्था दिली की, व्यक्ती आपल्या आई–वडिलांच्या परवानगीशिवाय भिख्खुसंघात दीक्षा घेऊ शकत नाही. याचे तात्पर्य व्यक्ती आपल्या आई–वडिलांप्रती कर्तव्य सोडून भिक्खु बनू शकत नाही. बुद्धांने गृहस्थासाठी दिलेल्या तत्वात आई–वडिलांची सेवा प्रथम होती.

प्राचीन भारतात आई–वडिलांची सेवा सर्वात मोठे मूल्य मानले जात होते. या मूल्याच्या प्रचार–प्रसारासाठी पुराण व बौद्ध जातक कथांमध्ये अनेक प्रसंग मिळतात, ज्याच्या माध्यमातून यास जास्त व्यावहारिक बनवले जाऊ शकेल. श्रवणकुमारची गोष्ट सर्वांना माहित आहे. येथे अनेक लोककथा व लोकगीतांमध्ये आई–वडिलांच्या सेवाचा उल्लेख करण्यात आला आहे. जातक कथांमध्ये असे अनेक संदर्भ मिळतात, ज्यात बोधिसत्वांनी आपल्या आई–वडिलांच्या सेवेत जीवनाची आहुती दिली होती. चुल्लनन्दिय जातकात बोधिसत्व हिमालयात नन्दिय वानर होते. त्यास छोटा भाऊ होता. ते दोघे ८० हजार वानरांचे नेतृत्व करत असल्यामुळे आपल्या आंधळ्या आईची सेवा पूर्ण वेळ करु शकत नव्हते म्हणून त्यांनी वानरांचे नेतृत्व सोडून पूर्ण वेळ आईची सेवा करण्यास सुरुवात केली.

एकेदिवशी एक शिकारी, शिकारीच्या शोधात बोधिसत्व आई व छोट्या भावासह राहत असलेल्या झाडाखाली आला. शिकारीचे लक्ष त्याच्या आईकडे गेले व त्याने आईच्या दिशेने बाण साधला. मातृभक्त नन्दिय शिकारीसमोर येऊन म्हणाला की, हवं तर मला मार पण माझ्या आईला सोड. निर्दयी शिकारीने बोधिसत्वाची हत्या केली. त्यानंतर शिकारीने छोटा भाऊ व आईला मारले.

आई, बोधिसत्व व भावाच्या हत्येच्या महापापामुळे त्यावेळी भयंकर वादळ आले, ज्यात शिकारीचे संपूर्ण कुटूंब मरण पावले. नंतर तुटलेल्या घराच्या खांबाखाली दबून तो पापी शिकारी सुद्धा मरण पावला.

आज काही लोक आपल्या आई–वडिलांना घराबाहेर काढतात. काही त्यांची संपत्ती बळकावून त्यांना वृद्धाश्रमात पाठवतात. पण त्यांना हे माहित नसते की, त्यांचे मुलं भविष्यात त्यांच्यासोबत असाच व्यवहार करतील.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | ऋतु– सौर ग्रीष्म |
| १५ मे २०२६ | कृष्ण पक्ष |
| शुक्रवार | तिथि:त्रयोदशी ०८:३१:३१ |
| विक्रम संवत्– २०८२ | तिथि:चतुर्दशी |
| वैशाख शके | २९:११:२२+ |
| संवत्– १९४८ | नक्षत्र:अश्विनी |
| संवत्सर –पराभवनाम | २०:१४:३२ |
| अयन– उत्तरायणारंभ | योग:आयुष्मान |
| मास– वैशाख | १४:२०:४९ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९४९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | | | 4 | | 9 | | 1 | |
| 2 | 1 | 7 | | | 6 | 9 | 4 | |
| 4 | 5 | | | | | | | |
| | | 5 | | | 1 | 3 | 9 | 4 |
| | | | 8 | | 3 | | | |
| 1 | 2 | 3 | 9 | | | 5 | | |
| | | | | | | | 7 | 9 |
| | 4 | 6 | 1 | | | 8 | 5 | 2 |
| | 7 | | 2 | | 5 | | | 6 |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९४८ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 1 | 9 | 7 | 4 | 3 | 2 | 8 | 6 |
| 3 | 4 | 8 | 2 | 5 | 6 | 7 | 1 | 9 |
| 2 | 6 | 7 | 8 | 1 | 9 | 5 | 4 | 3 |
| 9 | 2 | 4 | 1 | 6 | 8 | 3 | 7 | 5 |
| 8 | 5 | 1 | 9 | 3 | 7 | 6 | 2 | 4 |
| 7 | 3 | 6 | 5 | 2 | 4 | 1 | 9 | 8 |
| 6 | 8 | 3 | 4 | 7 | 1 | 9 | 5 | 2 |
| 1 | 9 | 2 | 3 | 8 | 5 | 4 | 6 | 7 |
| 4 | 7 | 5 | 6 | 9 | 2 | 8 | 3 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १२५२ – पोप इनोसंट चौथ्याने पोपचा फतवा काढून ख्रिश्चन धर्म न पाळणाऱ्यांचा शारिरीक छळ करण्यास मुभा दिली.
- १५२५ – फ्रँकेनहाउसेनची लढाई.
- १६०२ – बार्थोलोम्यु गॉस्नॉल्ड हा केप कॉडला पोचणारा प्रथम युरोपीय झाला.
- १६१८ – योहान्स केपलरने आपल्या ग्रहगतीचा तिसरा सिद्धांताला पुष्टी दिली.
- १७१८ – जेम्स पकलने मशीन गनचा पेटंट घेतला.
- १७९५ – नेपोलियन बोनापार्टने मिलान जिंकले.

### राष्ट्रीय

- १९८७ – न्यायालयीन निर्णयामुळे निवडणूक हरलेल्या इंदिरा गांधींनी आणीबाणी पुकारली, असा निष्कर्ष शहा आयोगाने जाहीर केला.
- २००३ – मुंबई–अमृतसर सुवर्ण मंदिर एक्स्प्रेसला लुधियानाजवळ आग, ३८ ठार.

### जन्म

- १७२० – मॅक्सिमिलियन हेल, स्लोव्हेकियन अंतराळतज्ञाचा जन्म.
- १८१७ – देवेंद्रनाथ टागोर, बंगाली समाजसुधारकाचा जन्म.
- १८५७ – विल्यामिना फ्लेमिंग, स्कॉटिश अंतराळतज्ञाचा जन्म.
- १८५९ – पियरे क्युरी, फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञाचा जन्म.
- १९०७ – क्रांतिकारक सुखदेवचा जन्म.

### निधन

- १०३६ – गो–इचिजो, जपानी सम्राटाचे निधन.
- ११७४ – नुरुद्दीन, सिरीयाचा राजाचे निधन.
- १४७० – चार्ल्स आठवा, स्वीडनचा राजाचे निधन.
- १७६० – अलौंगपाया, म्यानमारचा राजाचे निधन.

## : SMS :

Manzil ki taraf badte chalo.
Jo Dil kahe usi raah ko chuno.
Peeche walo ko aage na aane do
aur jo aage hain unse aage niklo.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३९.७ | ३० |
| अहमदनगर | ३९.४ | २९ |
| अकोला | ४५.६ | ३३.९ |
| अमरावती | ४३.९ | ३३.७ |
| बीड | ४७.१ | ३२.४ |
| भंडारा | ४५.९ | ३१.९ |
| बुलढाणा | ४३.९ | २७.१ |
| चंद्रपूर | ४६.६ | ३२.७ |
| चेन्नई | ४१.४ | २९.५ |
| नवी दिल्ली | ४३.८ | ३०.५ |
| धुळे | ४३.६ | ३०.४ |
| गोंदिया | ४५.५ | २९.५ |
| जळगाव | ४५ | ३३.३ |
| कोल्हापूर | ३९.५ | २३.९ |
| लातूर | ४१ | ३०.२ |
| मुंबई | ४० | ३४ |
| नागपूर | ४५.५ | ३१.९ |
| नांदेड | ४४.२ | ३३ |
| नंदूरबार | ४३.७ | ३१ |
| नाशिक | ४१.३ | २७.४ |
| पुणे | ३६.९ | २५.६ |
| पंढरपूर | ४१.२ | ३१ |
| सातारा | ३८.३ | २३.१ |
| सांगली | ४०.९ | २४.९ |
| सोलापूर | ४२.४ | ३१.९ |
| वर्धा | ४६.६ | ३३.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : उत्तर
विश्वासाचे वातावरण राहिल. योग्यता, अनुभवाचा फायदा होईल.

**तूळ :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : दक्षिण
ठरविलेली कामे वेळेवर होतील.

**वृषभ :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : उत्तर
कुटूंबात अनुकूल कार्य होतील. आपले महत्त्व स्वीकारले जाईल. समाजात कामांना सम्मान मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पूर्व
व्यावसायिक योजना यशस्वी होतील. भौतिक सुख–सुविधेचे साधन मिळेल.

**मिथून :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पूर्व
आर्थिक स्थिती साधारण राहिल. विचार करुन विवेकाने निर्णय घ्यावयास हवे.

**धनू :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : उत्तर
आर्थिक स्वरुपात दिवस चांगला राहण्याची शक्यता आहे. स्फूर्तिवान जाणवाल.

**कर्क :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पूर्व
नोकरीत कार्यकौशल्याचा फायदा मिळेल. पैशात वाढ होईल. वेळेचा सदुपयोग करु शकाल.

**मकर :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पूर्व
कौटूंबिक चिंतेमुळे मन उदास राहिल. अधिक खर्च करु नका, अन्यथा समस्या वाढतील.


**सिंह :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : दक्षिण
विचारांनूसार कामे करा. शत्रूंचे षडयंत्र विफल होईल. भागीदारी व्यवसायात घेतले गेलेले निर्णय फायद्याचे ठरतील.

**कुंभ :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पूर्व
वाहन सुख मिळण्याचे योग आहे. कामकाजात स्थिती लाभदायक राहील.

**कन्या :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पूर्व
कौटूंबिक समस्यांकडे दुर्लक्ष करु नका. समृद्धीचे योग येतील. आत्मविश्वास वाढेल.

**मीन :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर
विशेष प्रयत्नांनी अभिष्ट कार्य पूर्ण होऊ शकतील. शत्रू त्रास देऊ शकतात.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९४९



**आडवे शब्द**
१. प्रख्यात, सुप्रसिद्ध
३. पहारेकरी
७. आभाराचा शब्द
१०. लावणीतील लावण्यवती
११. भार, बोजा
१२. संतुष्ट झालेला
१३. डोंगराचा कोसळणारा भाग
१५. अपमान
१७. जुनाच्या विरुद्ध
१९. घोटाळा
२०. संरक्षक भिंत
२२. गडीमाणसे
२६. सरपटणारा घरातील प्राणी
२७. हाताचा तळवा
३०. श्रम, मेहनत
३१. वेळ घालविणे
३२. सूर्याचे एक नाव
३३. ब्रश (चित्रकाराचा)
३४. आवकीचे खाते
३६. प्रतिस्पर्धी
३७. कुबड
३९. वस्तू, माल
४०. सैन्याचा दाणागोटा
४२. झाडलोट शिंपण इत्यादी, 'सडा ––––'
४५. कर्मदरिद्री
४६. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री (नाव)
४८. समुद्र
५०. दाट, घट्ट, ढग
५१. सत्ता
५३. डाळिंब्या
५४. अजागळ
५६. पृथ्वी
५७. गणपतीचे एक नाव
५८. पोलीस ठाण्याचा प्रमुख (हिंदी)
६०. सारासार विचार
६२. आकाश
६३. छोटासा
६४. शाळा
६७. परीक्षा, तपासणी
६८. ढीग
६९. जाळणारी, अति तीव्र
७१. सहा आसनी रिक्षा
७५. मार्गस्थ
७७. चौसोपी अनेक खोल्यांचे घर
७८. कर्ण
७९. अरण्य
८०. अजूनही स्त्रियांचेच समजले जाणारे काम
८१. जोडीतील एक चर्मवाद्य

**उभे शब्द**
१. 'पक पक पकाक'चा नायक
२. मृत्यू
३. गवंडी, रहस्य (हिंदी)
४. खोदकाम
५. सेवक
६. रमापती
७. मालक
८. सोसाट्याचा वारा
९. किंमत
११. वर–वधूची मिरवणूक
१४. दुप्पट (इंग्रजी)
१६. फुरसत, विश्रांती
१८. वाणी, बोलणे
१९. घट्ट पकड असणारा सरपटणारा प्राणी
२१. दारावरील खुणेचा आवाज
२३. आवरण
२४. एक आंबट पालेभाजी
२५. विद्या
२६. लेंगा
२८. बहुतेकांसाठी साप्ताहिक सुट्टीचा दिवस
२९. लाजिरवाणे
३३. पंडु राजाच्या दोन बायकांची नावे
३५. माणूस
३८. काळी मैना– एक बोर प्रकार
३९. 'बुगडी'च्या गाण्यातील गाव
४१. एक तारवाद्य
४२. शक्यता
४३. नेत्राला रमविणारे दृश्य
४४. विश्रांती, आराम
४५. राजसभा
४७. वुर्तळ
४९. अव्यवस्थित कारभार
५२. वेडावाकडा
५४. भीमाजवळचे शस्त्र
५५. तारणारा
५७. भव्य
५९. भित्रा, अव्यवस्थित वागणारा
६०. दिनांक, इतिहास (हिंदी)
६१. अगदी त्याचप्रमाणे
६३. पोते
६४. वितरण करणारा
६५. जेव्हा
६६. जुगाराचा एक प्रकार
७०. विश्वास, खात्री, भरोसा
७२. अंत:करण
७३. सोनसळी धान्य
७४. दीर्घच्या विरुद्ध
७६. 'अजोबा' हाक मारणारी

**जम्बो शब्दकोडे क्र. ९४८ चे उत्तर**

आडवे उत्तर १.हाती घ्याल ते तडीस न्या ७.रोजमेळ ११.टर १२.रन १३.नख १४.मार १५.कपाळ १६.कवतिक १८.कलप १९.सीमा २०.भरमसाठ २२.सरकणे २३.तान २४.भारा २५.घरगुती २७.धनी २८.वसाहत ३०.सालस ३२.रतन ३४.लखलखीत ३७.कीर ३८.वारेमाप ४१.खवाट ४१अ.डकवणे ४२.कानस ४३.रीतसर ४४.पावक ४७.भान ४८.कोमट ४९.कवडसा ५०.मग ५१.घोसदार ५२.वारसदार ५४.पात्रता ५६.समर ५८.कथन ५९.दर ६०.पसा ६२.दुधारी ६३.लहान ६६.पाक ६८.पसारा ६९.तक ७१.इंद्र ७२.चोरवट ७४.गरीब ७६.सामाचार ७८.पर्वत ७९.कपार ८०.लवकर

उभे उत्तर : १.हाट २.तीरकमान ३.लघळ भवानी ४.तरतमभाव ५.डीन ६.न्यायिक ८.जनक ९.मेख १०.करपणे १४.मालक–मालकीण १७.तिमिर १८.कर १९.सीताहरण २१.सारासार २२.सती २६.गुराखी २७.धनवान २९.तलवार ३१.सरणे ३३.मामा ३५.खट ३६.तडकसार ३९.रेसकोर्स ४०.परीट ४१.खसखस ४२.कानमंत्र ४४.पाव ४५.वडवानल ४९.करकरीत ५०.मदार ५०अ.गर ५१.घोर ५३.सदन ५४.पालापाचोळा ५५.ताप ५७.मनोरा ६१.सापट ६२.दुपारी ६४.हालचाल ६५.चंद्रकोर ६७.कर ७०.कसर ७३.वाघ ७४.गत ७५.बक ७७.रव

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या 337व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन

पुणे (दैनिक संध्या) : पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त आज काँग्रेस भवन येथे पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. अरविंद शिंदे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष अरविंद शिंदे म्हणाले की, "रणझुंजार, बहुआयामी आणि स्वराज्याच्या रक्षणासाठी प्राणांची आहुती देणारे धाकले धनी छत्रपती संभाजी महाराज यांचा आज जन्मोत्सव. औरंगजेबाच्या अमानुष छळासमोर न झुकता, स्वराज्यासाठी शेवटच्या रक्ताच्या थेंबापर्यंत लढणाऱ्या या राजाचा इतिहास आजच्या पिढीसाठी प्रेरणास्त्रोत आहे. इतिहासातील चुकीचे दाखले पुसून शंभूराजेंचे सत्य आणि दैदीप्यमान चरित्र घराघरात पोहोचवणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. शिवरायांचा वारसा आणि शंभूराजेंचे बलिदान हेच महाराष्ट्राच्या अस्मितेचे खरे आधारस्तंभ आहेत." यावेळी शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या समवेत माजी नगरसेवक अजित दरेकर, उपाध्यक्षा प्राची दुधाणे, सरचिटणीस सीमा सावंत, प्रियंका मधाळे, ऋग्वेदिता सपकाळ, संदिप मोकाटे, सुरेश नांगरे, फिरोज शेख, हरिदास अडसूळ, मुन्ना खंडेलवाल आदी उपस्थित होते.



### भाजप ओबीसी मोर्चाच्या सरचिटणीसपदी यशोधन आखाडे यांची निवड

पुणे (दैनिक संध्या) : भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा पुणे शहरच्या सरचिटणीसपदी यशोधन आखाडे यांची निवड करण्यात आली आहे. कसबा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या नेतृत्वात ही निवड जाहीर करण्यात आली. ओबीसी मोर्चा अध्यक्ष विकास लवटे यांच्या अध्यक्षतेखाली आणि अमित कंक यांच्या विशेष प्रयत्नातून ही निवड प्रक्रिया पूर्ण झाली. यावेळी कसबा उत्तर मंडल सरचिटणीस किरण जगदाळे, निलेश कदम, पुणे शहर युवा मोर्चा सरचिटणीस प्रणव गंजीवाले, ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष दिलीप पवार, कसबा उत्तर मंडल चिटणीस पुरण हुडके, मनीष जाधव, अभिजीत सावंत तसेच सर्व ओबीसी मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभल्याबद्दल यशोधन आखाडे यांनी सर्वांचे आभार मानले.

### उत्साह अन् इच्छा, महापौरांकडून धार्मिक स्थळांवरील कारवाईबाबत भूमिका स्पष्ट



पुणे (दैनिक संध्या) : आखाती देशातील युद्धामुळे इंधनाचा तुटवडा जाणवण्याची शक्यता असल्याने महापालिका अधिकाऱ्यांनी मेट्रो, विद्युत वाहनांचा वापर करावा. एकाच परिसरात राहणाऱ्या अधिकाऱ्यांनी एकाच मोटारीतून कार्यालयात यावे. नगरसेवकांनीही महापालिकेत एकत्रित यावे. मी स्वत: आठवड्यातून एक दिवस सायकलवर महापालिकेत येणार असल्याचे पिंपरी-चिंचवड महापौर रवी लांडगे यांनी गुरुवारी जाहीर केले. उद्या शुक्रवारी होणाऱ्या सर्वसाधारण सभेसाठी सायकलवरुन येणार असल्याचे त्यांनी सांगितले. अझरबैजानची राजधानी बाकू येथे १७ ते २२ दरम्यान होणाऱ्या संमेलनात १९४ देशातील अधिकारी, महापौर सहभागी होणार होते. या अभ्यास दौऱ्यातून शिकण्यास मिळणार होते. त्याचा शहरासाठी उपयोग झाला असता. त्यामुळे दौऱ्यावर जाण्याचा उत्साह आणि जाण्याची इच्छा होती. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनानुसार दौरा रद्द केल्याचे महापौर लांडगे यांनी सांगितले. स्वच्छतेबाबत चांगले काम केलेल्या मध्यप्रदेशातील इंदूर शहराचा दौरा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. महापालिका काटकसरीचे धोरण अवलंबणार आहे. विकास कामांची उद्घाटने, भूमीपूजन ऑनलाइन पद्धतीने केले जाईल. अधिकाऱ्यांनी एक दिवस सार्वजनिक वाहतूक सेवाचा वापर करावा. विद्युत वाहने वापरण्यास प्राधान्य द्यावे. नगरसेवकांनीही एकत्र आणि विद्युत वाहनांमधूनच महापालिकेत यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

### 'व्हीआयपीं'च्या शहरातील दौऱ्याचा ताफा आता निम्म्यावर!, पुणे पोलिसांचा निर्णय



पुणे (दैनिक संध्या) : महत्त्वाच्या व्यक्तींच्या (व्हीआयपी) शहरातील दौऱ्यांमध्ये रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांचा ताफा आता ५० टक्क्यांवर येणार आहेत. इंधन बचत, सरकारी खर्चावर नियंत्रण आणि साधेपणाला प्राधान्य देण्याच्या केंद्र आणि सरकारच्या धोरणानुसार पुणे पोलिसांनी व्हीआयपींच्या दौऱ्यातील वाहनांची संख्या निम्म्याने कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यापुढे शहरातील व्हीआयपी दौरे कमी वाहनांमध्ये होणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन आणि परकीय चलन बचतीसाठी केलेल्या आवाहनानंतर राज्य सरकारने विविध उपाययोजना हाती घेतल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या तत्काळ प्रभावाने कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बाहेरच्या दौऱ्यांदरम्यान निर्धारित संख्येपेक्षा अधिक वाहने ताफ्यात नसतील, याची जबाबदारी संबंधित पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांवर सोपविण्यात आली आहे. त्यानुसार आता पुण्यात देखील ताफ्यातील वाहने कमी होणार आहेत, असे पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी सांगितले. अमितेशकुमार म्हणाले, 'पूर्वी एखाद्या व्हीआयपी दौऱ्यासाठी सुरक्षा आणि राजशिष्टाचारानुसार (प्रोटोकॉल) साधारणपणे १२ ते १३ वाहनांचा ताफा ठेवला जात होता. मात्र, आता ही संख्या कमी करून केवळ ५ ते ६ वाहनांपर्यंत मर्यादित ठेवण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, अनेक व्हीआयपी व्यक्ती स्वतःहून दूरध्वनी करून आपल्या दौऱ्यात कमीत कमी वाहनांचा वापर करण्याची विनंती करत आहेत. राज्यात देखील आता अनावश्यक बाबी कमी केल्या जात आहेत. मंत्री आणि अधिकाऱ्यांनी अत्यावश्यक नसल्यास शासकीय विमान व हेलिकॉप्टरचा वापर टाळावा, सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर करावा, बैठका व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घ्याव्यात, तसेच शासकीय वाहनांचा काटेकोर आढावा घ्यावा, अशा सूचना राज्यस्तरावरून देण्यात आल्या आहेत.'

# 'दगडूशेठ' : विद्यार्थ्यांची १०वी व १२वी परीक्षेत उत्तम कामगिरी

## श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट ; अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत विद्यार्थ्यांनी मिळवले यश

पुणे (दै. संध्या)



श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळतर्फे सुरु असलेल्या जय गणेश पालकत्व योजनेतील विद्यार्थ्यांनी इयत्ता १० वी - १२ वी च्या परीक्षेत उत्तम कामगिरी केली. योजनेतील ११ विद्यार्थ्यांनी दहावी आणि २३ विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेत यश संपादन केले आहे. ट्रस्टने शैक्षणिक साहित्यासह इतरही गोष्टींच्या माध्यमातून दिलेल्या मदतीमुळे आणि गणरायाच्या आशिर्वादामुळे हे शक्य झाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

योजनेतील अनेक विद्यार्थ्यांची आई ही घरकाम करते, कोणाचे वडील पेंटिंग करतात, कोण कारखान्यात काम करतात तर कोण बिगारी काम करतात. अशा घरच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या विद्यार्थ्यांनी हे यश मिळविले आहे. मॉडर्न गर्ल्स हायस्कूलमध्ये शिकणारी समीक्षा भोसले ही विद्यार्थीनी ९४.४० टक्के गुण मिळवित योजनेंतर्गत प्रथम आली आहे. समीक्षा भोसले हिला मर्चंट नेव्ही मध्ये करिअर करण्याची इच्छा आहे. समीक्षा चे वडील हयात नाहीत तर आई स्वयंपाकाची काम करते. तरी देखील प्रतिकूल परिस्थितीत तिने यश मिळविले आहे. मॉडर्न हायस्कूलमधील आदित्य दहिवलीकर हा ८६.६० टक्के गुण मिळवित द्वितीय आला असून त्याला भविष्यात पीएसआय व्हायचे आहे. तर, नूतन बालविकास मंदिर शाळेतील मृणाली सावंत हिने ८२.२० टक्के मिळवित तृतीय क्रमांक पटकाविला आहे. तिचे वडील बिगारी काम करतात. याशिवाय राधिका जाधव, ओंकार खळे, आदित्य मूर्टे, साईराज जाधव, अस्मय विधाते, किरण म्हेत्रे, हर्षदा गुजले, मंजुनाथ नवटक्के या विद्यार्थ्यांनी देखील उत्तम यश मिळविले आहे. इयत्ता बारावीच्या परीक्षेत मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्समधील श्रुतिका होडे हिने कॉमर्स विभागातून ८३.१७ टक्के गुण मिळवित योजनेत प्रथम क्रमांक मिळविला आहे. तिला सीएमए होण्याची इच्छा असून त्याकरिता ती मेहनत घेत आहे. स.प.महाविद्यालयातील समृद्धी शिंदे हिने सायन्स विभागातून ८१.१७ टक्के गुण मिळवित योजनेत प्रथम क्रमांक पटकाविला.

## व्हेंटिव्ह हॉस्पिटॅलिटीची दमदार वाढ; FY26 मध्ये EBITDA मध्ये 28% वाढ

**PAT ₹502 कोटींवर**

पुणे (दै. संध्या)



Ventive Hospitality Limited ने 31 मार्च 2026 रोजी संपलेल्या चौथ्या तिमाही (Q4 FY26) आणि संपूर्ण आर्थिक वर्ष FY26 चे एकत्रित आर्थिक निकाल जाहीर करत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. कंपनीच्या महसूल, EBITDA आणि नफ्यात लक्षणीय वाढ झाली असून, विशेषतः करानंतरच्या नफ्यात (PAT) विक्रमी वाढ दिसून आली आहे.

Q4 FY26 मध्ये कंपनीने ₹870 कोटींचे एकत्रित उत्पन्न नोंदवले, जे मागील वर्षाच्या तुलनेत 21 टक्क्यांनी अधिक आहे. या तिमाहीत कंपनीचा EBITDA ₹476 कोटी राहिला असून त्यात 28 टक्क्यांची वाढ झाली आहे. EBITDA मार्जिन 55 टक्क्यांवर पोहोचले असून त्यात 3 टक्के अंकांची वाढ झाली आहे. कंपनीचा करानंतरचा नफा (PAT) ₹259 कोटी राहिला, जो मागील वर्षाच्या तुलनेत 72 टक्के अधिक आहे.

संपूर्ण आर्थिक वर्ष FY26 मध्ये कंपनीचे एकत्रित उत्पन्न ₹2,666 कोटी झाले असून त्यात 24 टक्क्यांची वाढ झाली आहे. वार्षिक EBITDA ₹1,299 कोटी राहिला, जो 28 टक्क्यांनी वाढला आहे. EBITDA मार्जिन 49 टक्के राहिले. कंपनीचा पूर्ण वर्षाचा PAT ₹502 कोटींवर पोहोचला असून FY25 मधील ₹48 कोटींच्या तुलनेत त्यात तब्बल 939 टक्क्यांची वाढ झाली आहे. FY25 चे तुलनात्मक आकडे प्रोफॉर्मा आधारावर देण्यात आले आहेत.

कंपनीच्या हॉस्पिटॅलिटी व्यवसायातून Q4 FY26 मध्ये ₹658 कोटींचे उत्पन्न मिळाले, ज्यामध्ये 13 टक्क्यांची वाढ झाली. हॉस्पिटॅलिटी EBITDA ₹295 कोटी राहिला असून त्यात 9 टक्के वाढ झाली आहे. EBITDA मार्जिन 45 टक्के राहिले. भू-राजकीय तणाव आणि प्रवास निर्बंधांमुळे या तिमाहीत हॉस्पिटॅलिटी व्यवसायाच्या महसूल आणि मार्जिनवर काही प्रमाणात परिणाम झाल्याचे कंपनीने नमूद केले. पूर्ण आर्थिक वर्ष FY26 मध्ये हॉस्पिटॅलिटी व्यवसायाचे उत्पन्न ₹1,980 कोटी राहिले, ज्यात 23 टक्क्यांची वाढ झाली. EBITDA ₹735 कोटी राहिला, जो 33 टक्के वाढ दर्शवतो. EBITDA मार्जिन 37 टक्के राहिले असून त्यात 3 टक्के अंकांची सुधारणा झाली आहे. कंपनीच्या पुण्यातील प्रीमियम कमर्शियल रिअल इस्टेट आणि रिटेल मालमत्तांचा समावेश असलेल्या ॲन्युइटी पोर्टफोलिओमधून Q4 FY26 मध्ये ₹127 कोटींचे उत्पन्न मिळाले, तर EBITDA ₹113 कोटी राहिला. संपूर्ण आर्थिक वर्षात या व्यवसायातून ₹504 कोटींचे उत्पन्न मिळाले असून EBITDA मार्जिन 90 टक्के राहिले. यावेळी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी Ranjit Batra म्हणाले, "FY26 हे व्हेंटिव्हसाठी केवळ आर्थिक आकड्यांच्या दृष्टीने नव्हे, तर भविष्यातील दिशादर्शक प्रवासाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचे वर्ष ठरले आहे. PAT मध्ये 939 टक्के वाढ आणि EBITDA मध्ये 28 टक्के वाढ ही आमच्या व्यवसाय मॉडेलची ताकद आणि शिस्तबद्ध अंमलबजावणीचे प्रतीक आहे."

ते पुढे म्हणाले की, आधुनिक प्रवासी आता केवळ निवास नव्हे तर अनुभव, वेलनेस आणि लाइफस्टाइल शोधत आहे. Soho House, Sol de Goa आणि वाढत्या लीजर पोर्टफोलिओच्या माध्यमातून कंपनी लक्झरी हॉस्पिटॅलिटी आणि क्युरेटेड लिव्हिंग क्षेत्रात स्वतःची मजबूत उपस्थिती निर्माण करत आहे. FY27 मध्ये योग्य मालमत्ता, मजबूत भागीदारी आणि प्रीमियमायझेशनच्या स्पष्ट दृष्टीकोनासह कंपनी पुढील वाढीसाठी सज्ज असल्याचेही त्यांनी सांगितले.

## स्वारगेट ते कात्रज मेट्रोच्या महत्वाच्या टप्प्याला सुरुवात

पुणे (दै. संध्या)

पुणे शहरातील मेट्रोचे जाळे दिवसेंदिवस विस्तारत आहे. यामुळे पुणेकरांचा प्रवास आणखी सुकर न आरामदायी होत आहे. शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत मैलाचा दगड ठरणाऱ्या पुणे मेट्रोच्या स्वारगेट ते कात्रज या विस्तारित मार्गिकेच्या कामाला आता गती मिळाली आहे. या मार्गिकेवरील महत्त्वाच्या टप्प्यातील कामाला सुरुवात झाली आहे. स्वारगेट ते कात्रज मेट्रो या ५.४६ किलोमीटर लांबीच्या भुयारी मार्गिकेसाठी आवश्यक असलेल्या पहिल्या 'टीबीएम टनेल सेग्मेंट'च्या कास्टिंगचे काम सुरू झाले आहे. 'महामेट्रो'चे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते हे कास्टिंगचे काम सुरू करण्यात आले. या प्रसंगी महामेट्रोचे संचालक (कार्य) अतुल गाडगीळ, संचालक (प्रणाली व संचालन) विनोदकुमार अग्रवाल, संचालक (वित्त) हरेंद्र पांडे यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी आणि कंत्राटदार कंपनी 'सीईएम इंडिया'चे प्रतिनिधी उपस्थित होते. स्वारगेट ते कात्रज या विस्तारित मार्गिकेमुळे दक्षिण पुणे थेट मेट्रोच्या जाळ्याशी जोडले जाणार आहे. या मार्गावर एकूण पाच भुयारी स्थानके असणार आहेत. स्वारगेट ते कात्रज हा मार्ग पूर्णतः भुयारी असून, त्याचे बांधकाम अत्याधुनिक 'टनेल बोरिंग मशिन'द्वारे केले जाणार आहे. या बोगद्याच्या अंतर्गत मजबुतीकरणासाठी प्रीकास्ट आरसीसी 'सेग्मेंट'चा वापर केला जातो. या मार्गिकेवरील दोन्ही बाजूंचे बोगदे मिळून ९.७ किलोमीटर लांबीच्या मार्गासाठी एकूण ६ हजार ९९३ रिंग तयार केल्या जाणार आहेत. प्रत्येक रिंग ही पाच 'सेग्मेंट' आणि एक 'की सेग्मेंट' या रचनेत असेल. यासाठी 'सीबीई' ग्रुपचे आठ विशेष साचे वापरले जात आहेत. मेट्रोच्या बोगद्याचा बाह्य व्यास ६.३५ मीटर असून, अंतर्गत व्यास ५.८ मीटर आहे.

## लाच प्रकरणात महिला पोलीस अधिकाऱ्याला पकडले

पुणे (दै. संध्या)

पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेतील सहायक पोलीस निरीक्षक वैशाली तोटेवार यांनी मध्यस्थामार्फत २८ लाख रुपयांची लाच घेतल्याचे प्रकरण ताजे असतानाच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील बावधन पोलीस ठाण्यात नियुक्तीस असलेल्या सहायक पोलीस निरीक्षक ज्योती तांबे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. तांबे यांनी एकाकडून ५० हजारांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्यानंतर एसीबीच्या पथकाने ही कारवाई केली. या प्रकरणी बावधन पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस निरीक्षक ज्योती पांडुरंग तांबे (वय ४१, सध्या रा. ड्रिम रिदम सोसायटी, पाटीलनगर, बावधन) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात तांबे यांना रात्री उशिरा ताब्यात घेण्यात आले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार आणि त्यांच्या नातेवाईकांविरुद्ध बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात मदत करणे, अटक न करणे, तसेच लवकर आरोपपत्र दाखल करण्यासाठी सहायक पोलीस निरीक्षक तांबे यांनी तक्रारदाराकडे ५० हजारांची लाच मागितली होती. तक्रारदाराने त्यांना पहिला हप्ता म्हणून ५० हजार रुपये लाच दिली होती. त्यानंतर तडजोडीत आणखी पैसे देण्याची मागणी त्यांनी केली होती. याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिल्यानंतर पडताळणी करण्यात आली. चौकशीत तांबे यांनी लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्यानंतर रात्री उशिरा त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याविरुद्ध बावधन पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

## यूडब्ल्यूए इंडियाकडून ऐतिहासिक वार्षिक शिष्यवृत्ती कटिबद्धतेची घोषणा

पुणे (दै. संध्या)

■ गुणवंत भारतीय विद्यार्थ्यांसाठी जागतिक शिक्षणाची नवी संधी; मुंबई आणि चेन्नई कॅम्पसमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

University of Western Australia (यूडब्ल्यूए) यांनी यूडब्ल्यूए इंडियाच्या माध्यमातून ऐतिहासिक शिष्यवृत्ती प्रोग्रामची घोषणा केली आहे. भारतातील विद्यार्थ्यांसाठी ही आतापर्यंतची सर्वात मोठी स्वतंत्र शिष्यवृत्ती कटिबद्धता मानली जात आहे. विविध शैक्षणिक, सामाजिक-आर्थिक आणि प्रादेशिक पार्श्वभूमी असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण अधिक सुलभ करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

यावेळी युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे व्हाइस-चान्सलर प्रोफेसर Amit Chakma म्हणाले, "या ऐतिहासिक घोषणेमधून भारताप्रती यूडब्ल्यूएची सखोल आणि कायमस्वरूपी कटिबद्धता दिसून येते. आर्थिक मर्यादांमुळे विद्यार्थ्यांच्या महत्त्वाकांक्षेमध्ये अडथळा येऊ नये, यासाठी आम्ही जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त शिक्षण अधिक व्यापक करण्यावर भर देत आहोत. भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक करिअरसाठी सक्षम बनविणे हे आमचे ध्येय आहे."

यूडब्ल्यूए इंडियासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून मुंबई आणि चेन्नई येथील कॅम्पसमध्ये एसटीईएम, व्यवसाय आणि तंत्रज्ञान विषयांतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जाणार आहेत. हे अभ्यासक्रम जागतिक उद्योगांच्या मागणीसह भारतातील बदलत्या कार्यबलाच्या गरजांशी सुसंगत असतील. अधिक माहितीसाठी विद्यार्थी यूडब्ल्यूए इंडिया अधिकृत संकेतस्थळ ला भेट देऊ शकतात.

या बहु-स्तरीय शिष्यवृत्ती आराखड्यात शिक्षण शुल्कातील सवलतीसह शैक्षणिक गुणवत्ता, आर्थिक गरज, नेतृत्व क्षमता आणि प्रादेशिक समावेशकता यांचा विचार करण्यात आला आहे. या प्रोग्राममध्ये गुणवत्ता शिष्यवृत्ती, जागतिक उत्कृष्टता शिष्यवृत्ती, इक्विटी आणि सीएसआर-समर्थित निधी, राज्य सरकारांच्या सहयोगातून उपलब्ध संधी तसेच माजी विद्यार्थ्यांच्या पाठबळावर आधारित शिष्यवृत्तींचा समावेश आहे. प्रारंभी महाराष्ट्र आणि तामिळनाडू राज्यांमध्ये या उपक्रमाची अंमलबजावणी होणार आहे.

विद्यार्थ्यांना एकापेक्षा अधिक प्रकारच्या शिष्यवृत्तींचा लाभ घेण्याची सुविधा या योजनेत देण्यात आली असून त्यामुळे आर्थिक अडथळे मोठ्या प्रमाणात कमी होणार आहेत. सर्व शिष्यवृत्ती यूडब्ल्यूएच्या प्रस्थापित धोरणांनुसार दिल्या जाणार असून प्रत्येक प्रवेश प्रक्रियेपूर्वी पात्रतेचे निकष पारदर्शकपणे जाहीर करण्यात येणार आहेत.

यूडब्ल्यूए इंडियाच्या पहिल्या प्रवेश प्रक्रियेपासूनच या शिष्यवृत्ती लागू होणार असून पहिल्या वर्षानंतर या आराखड्याचे औपचारिक पुनरावलोकन करण्यात येणार आहे. मागणी, परिणाम आणि विस्ताराच्या संधींचे मूल्यांकन करून पुढील दिशा निश्चित केली जाणार आहे.

या उपक्रमामुळे भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील शिक्षण व कौशल्य विकास भागीदारी अधिक मजबूत होण्यास मदत होणार असल्याचे मत शिक्षण क्षेत्रातून व्यक्त केले जात आहे.

# सॅमसंगकडून 'उद्याचा मार्ग शोधा' उपक्रमाच्या पाचव्या पर्वाची केली घोषणा

पुणे (दै. संध्या)




सॅमसंग ने आपल्या प्रमुख नवोन्मेष आणि शिक्षण उपक्रम 'उद्याचा मार्ग शोधा'च्या पाचव्या पर्वाची घोषणा केली आहे. भारतातील तरुण नवोन्मेषकांना वास्तवातील सामाजिक समस्यांवर तंत्रज्ञानाधारित उपाय शोधण्यासाठी प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यंदा विजेत्या संघांसाठीच्या अनुदानाची रक्कम दुप्पट करून तब्बल २ कोटी रुपये करण्यात आली आहे. भारतामध्ये कंपनीची ३० वर्षे पूर्ण होत असताना हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित जीवनशैली, आरोग्य व शिक्षण, पर्यावरणीय शाश्वतता तसेच क्रीडा व तंत्रज्ञान या चार प्रमुख विषयांवर १४ ते २२ वयोगटातील विद्यार्थी आपले अभिनव प्रकल्प सादर करू शकतील. यंदाच्या पर्वातील सर्वोत्तम चार विजयी संघांना भारतीय तंत्रज्ञान संस्था, दिल्ली येथे

### विजेत्यांसाठी २ कोटी रुपयांचे अनुदान

उद्योजकीय संवर्धन सहाय्यासह २ कोटी रुपयांचे अनुदान दिले जाईल. तसेच सर्वोत्तम २० संघांना २० लाख रुपये, तर सर्वोत्तम ४० संघांना ८ लाख रुपये आणि सॅमसंगची उपकरणे दिली जाणार आहेत.

सहभागी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष नमुना निर्मिती सहाय्य, तज्ज्ञ मार्गदर्शन, गुंतवणूकदारांशी संवाद, निवासी प्रशिक्षण शिबिरे तसेच देशभरातील १०० शहरांमध्ये रचनात्मक विचार कार्यशाळांचा लाभ मिळणार आहे. याशिवाय दोन लाख चाळीस हजार तासांहून अधिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

सॅमसंग दक्षिण-पश्चिम आशियाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जे. बी. पार्क म्हणाले, "गेल्या तीन दशकांपासून भारताच्या डिजिटल आणि नवोन्मेष प्रवासात सहभागी होण्याचा आम्हाला अभिमान आहे. 'उद्याचा मार्ग शोधा' हा उपक्रम तरुणांना वास्तविक समस्यांवर परिणामकारक उपाय शोधण्यासाठी सक्षम करत आहे. यंदाच्या पर्वातून आम्ही शाळा आणि महाविद्यालयांपर्यंत अधिक व्यापक पोहोच साधत आहोत."

भारत सरकारचे प्रधान वैज्ञानिक सल्लागार प्रा. अजय कुमार सूद यांनी सांगितले की, "भारतामधील तरुण नवोन्मेषक जागतिक समस्यांवरही परिणामकारक उपाय शोधत आहेत. अशा उपक्रमांमुळे भविष्यातील उद्योजक आणि संशोधकांची मजबूत साखळी निर्माण होत आहे."

भारतीय तंत्रज्ञान संस्था, दिल्लीचे संचालक प्रा. रंगन बनर्जी यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तांत्रिक मार्गदर्शन, आंतरशाखीय संशोधन आणि नमुना निर्मितीची संधी मिळाल्यास ते स्थानिक तसेच जागतिक समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय विकसित करू शकतात."

प्रधान वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाच्या संचालक डॉ. सपना पोती म्हणाल्या, "ज्ञानाधारित आणि नवोन्मेषप्रधान भारत घडविण्यासाठी तरुणांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करणे अत्यावश्यक आहे."


या उपक्रमासाठी अर्ज प्रक्रिया ७ मे ते ३ जुलै २०२६ या कालावधीत खुली राहणार आहे. त्यानंतर प्रत्येक विषयातून २५ अशा एकूण १०० संघांची निवड करण्यात येईल. पुढील टप्प्यांमध्ये चित्रफीत सादरीकरण, प्रत्यक्ष मार्गदर्शन, प्रात्यक्षिक निर्मिती आणि निवासी प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जातील.

उपांत्य फेरीतील विद्यार्थ्यांना सॅमसंगच्या बंगळुरू, नोएडा आणि दिल्ली येथील संशोधन व विकास केंद्रांना भेट देण्याची संधी मिळेल. अंतिम फेरीसाठी निवडलेल्या २० संघांना गुंतवणूकदारांशी भेट, सादरीकरणे आणि तज्ज्ञ मार्गदर्शनाचा लाभ मिळणार आहे.

२०१० मध्ये अमेरिकेत सुरू झालेला हा उपक्रम आता ६८ देशांमध्ये राबविला जात असून आतापर्यंत ३० लाखांहून अधिक तरुण त्यात सहभागी झाले आहेत.

**पुरस्कारांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल**

- सर्वोत्तम १०० संघ प्रमाणपत्रे
- सर्वोत्तम ४० संघ : ८ लाख रुपये व प्रत्येक सदस्यासाठी सॅमसंग संगणक
- सर्वोत्तम २० संघ : २० लाख रुपये व प्रत्येक सदस्यासाठी सॅमसंग घडीव दूरध्वनी
- विशेष पुरस्कार : डिजिटल प्रभाव पुरस्कार आणि समुदाय पसंती पुरस्कार - एकूण २.५ लाख रुपये
- सर्वोत्तम ४ विजेते संघ : भारतीय तंत्रज्ञान संस्था, दिल्ली येथे २ कोटी रुपयांचे उद्योजकीय संवर्धन अनुदान



## महाराष्ट्रात मतदार याद्यांची 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहिम

### ९.८६ कोटी मतदारांच्या घरी पोहोचणार निवडणूक यंत्रणा

**मुंबई (दै. संध्या) :**

भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'विशेष सखोल पुनरिक्षण' (SIR) मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला आहे. या मोहिमेत महाराष्ट्राचा समावेश असून, राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे.

महाराष्ट्रात विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम अत्यंत व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहे. यात राज्यातील एकूण ९,८६,४४,४१३ मतदारांच्या तपशिलाची खातरजमा मतदान केंद्रस्तरीय अधिका-यांमार्फत (BLO)नियुक्त करण्यात येणार आहे. हे अधिकारी प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन माहिती गोळा करतील. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमण्यात आलेले 'बूथ लेव्हल एजंट्स' (BLA) त्यांना सहकार्य करणार आहेत. सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामात व्यस्त असलेल्या क्षेत्रीय यंत्रणेचा विचार करून या तिसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबरमध्ये पूर्ण होईल.

दिनांक २० ते २९ जून २०२६ या कालावधीत बीएलओ यांना प्रशिक्षण आणि पूर्वतयारी करण्यात येईल. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी जाऊन भेटी देण्यात येतील. ५ ऑगस्ट २०२६ रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल तसेच ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती नोंदविता येतील आणि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादीची प्रसिद्ध करण्यात येईल.

भारत निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले एजंट (BLA) नियुक्त करण्याचे आवाहन केले आहे. यामुळे मतदार यादीतून दुबार नावे तसेच मृत व्यक्तींची नावे काढणे आणि नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि अचूक होण्यास मदत होणार आहे.

# 'पॉपाईज इंडिया'ची पुण्यात तीन नवीन स्टोअर्स सुरू

**पुणे (दै. संध्या) :**

■ आता पुणेकरांना मिळणार "लुइसियाना"च्या भन्नाट चवींचा स्वाद

■ प्रसिद्ध चिकन सँडविचपासून नव्या 'डिप एन' ड्रिप' रेंजपर्यंत, 'पॉपाईज'च्या खास आणि झणझणीत फ्लेवर्सचा आता पुण्यात अनुभव



ज्युबिलंट फूडवर्क्स लि. या भारतातील आघाडीच्या फूड सर्व्हिस कंपनीने पुण्यात पॉपाईज® या ब्रँडची तीन नवीन रेस्टॉरंट्स सुरू केली आहेत. कंपनीने आज ही घोषणा केली. भारतातील वेगाने वाढणाऱ्या आणि उच्च क्षमता असलेल्या खाद्यपदार्थांच्या बाजारपेठेत पॉपाईज® या ब्रँडचा प्रवेश होत आहे. प्रमुख शहरांकडे लक्ष केंद्रित करीत आणि ग्राहकांची बदलत्या आवडीनिवडी लक्षात घेत पॉपाईज® सातत्याने विस्तार करीत आहे.

मे महिन्यात सुरू होणारी ही तीन रेस्टॉरंट्स विमाननगरमधील फिनिक्स मार्केट सिटी, मगरपट्टा येथील सीझन्स मॉल आणि पिंपरी-चिंचवड येथील एल्प्रो सिटी स्क्वेअर मॉल अशा पुण्यातील महत्त्वाच्या ठिकाणी उघडली जाणार आहेत. त्यामुळे शहरातील प्रमुख निवासी आणि व्यावसायिक भागांमध्ये ग्राहकांना पॉपाईज® सहज उपलब्ध होणार आहे.

तरुण आणि आधुनिक जीवनशैली असलेली लोकसंख्या, मोठा विद्यार्थीवर्ग आणि वाढत्या काम करणाऱ्या तरूण व्यावसायिक वर्गामुळे पुणे हे वारंवार बाहेर खाण्याची आवड असलेले महत्त्वाचे शहर बनले आहे. जागतिक दर्जाच्या क्यूएसआर (क्विक सर्व्हिस रेस्टॉरंट) ब्रँड्ससाठी येथे ग्राहकांची मागणी झपाट्याने वाढत आहे. ग्राहकांच्या बदलत्या आवडी-निवडी लक्षात घेऊन पॉपाईज आता आपल्या खास 'लुइसियाना'-स्टाइलच्या चवी पुणेकरांसाठी घेऊन येत आहे.

पॉपाईज हा 'लुइसियाना' येथे सुरू झालेला जागतिक स्तरावर प्रसिद्ध ब्रँड आहे. आपल्या मसालेदार आणि चविष्ट फ्राईड चिकनसाठी तो ओळखला जातो. त्यांची खास रेसिपी १२ तास मॅरिनेट केली जाते आणि त्यात खास कंजून मसाल्यांचा वापर केला जातो. त्यामुळे जगभरातील ग्राहकांमध्ये या ब्रँडची मोठी लोकप्रियता आहे. 'पॉपाईज'च्या प्रसिद्ध चिकन सँडविचमुळे या ब्रँडला जागतिक स्तरावर मोठी ओळख मिळाली होती. बाजारात सादर झाल्यानंतर या सँडविचला ग्राहकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. बंगळुरू, चेन्नई, दिल्ली एनसीआर, पंजाब आणि मुंबई यांसारख्या शहरांमध्ये यश मिळवल्यानंतर आता पॉपाईज आपल्या खास डिशेस पुण्यातही घेऊन येत आहे.

ज्युबिलंट फूडवर्क्स लि.चे पॉपाईज ब्रँडसाठीचे कार्यकारी उपाध्यक्ष व चीफ बिझनेस ऑफिसर विभोर गुप्ता यांनी 'पॉपाईज'च्या सादरीकरणाबाबत आनंद व्यक्त करताना म्हटले, "पुण्यात पॉपाईज सुरू करण्याबाबत ग्राहकांकडून खूप चौकशी होत होत्या. त्यामुळे आता पॉपाईज सादर करताना आम्ही खूप उत्साहित आहोत. सुरुवातीला आमची तीन स्टोअर्स सुरू होत आहेत. यापुढे आणखी अनेक स्टोअर्स सुरू करण्याची आमची योजना आहे. तरुण, प्रवासाची आवड असलेले आणि वेगळ्या तसेच चविष्ट खाद्यपदार्थांचा शोध घेणारे ग्राहक मोठ्या प्रमाणात असल्यामुळे पुणे हे आमच्यासाठी मोठी क्षमता असलेले मार्केट आहे. भारतातील महत्त्वाच्या शहरांमध्ये 'पॉपाईज'चा विस्तार करण्याच्या दृष्टीने पुण्यातील ही सुरुवात एक धोरणात्मक टप्पा ठरणार आहे."

अ‍ॅबाक्कस म्युच्युअल फंडने ५,००० कोटी रुपये एयूएमचा

## १ लाख युनिक गुंतवणूकदारांचा टप्पा गाठला

**पुणे (दै. संध्या) :**

अ‍ॅबाक्कस म्युच्युअल फंडने त्यांच्या व्यवस्थापनाखालील मालमत्तेत (एयूएम) 5,000 कोटी रुपयांचा महत्त्वपूर्ण टप्पा ओलांडला आहे. फंड हाऊसने नमूद केले आहे की, एकूण युनिक गुंतवणूकदारांची संख्या 1 लाखांच्या पुढे गेली आहे, ज्यामधून गुंतवणूकदार आणि वितरण भागीदारांचा वाढता विश्वास दिसून येतो. अ‍ॅबाक्कस म्युच्युअल फंडने डिसेंबर 2025 मध्ये आपली पहिली योजना लाँच केली होती. फ्लेक्सी कॅप फंड श्रेणीतील त्यांच्या पहिल्या इक्विटी ऑफरला न्यू फंड ऑफर (एनएफओ) दरम्यान 2,468 कोटी रुपयांचा चांगला प्रतिसाद मिळाला. सध्या हे फंड हाऊस फ्लेक्सी कॅप फंड आणि स्मॉल कॅप फंड या श्रेणींमधील दोन इक्विटी योजनांसह लिक्विड फंड व्यवस्थापित करते. 8 मे 2026 पर्यंत फंड हाऊसचे एकूण एयूएम 5,482 कोटी रुपये आहे, ज्यामध्ये 2,001 ठिकाणे आणि 9,573 पिन कोडमधील 1,00,702 हून अधिक गुंतवणूकदारांचा समावेश आहे. श्री. सुनिल सिंघानिया यांनी स्थापन केलेला अ‍ॅबाक्कस म्युच्युअल फंड बाजारपेठेतील सखोल अनुभव आणि शिस्तबद्ध, संशोधन-आधारित गुंतवणूक दृष्टिकोनाला एकत्र आणतो. पोर्टफोलिओची रचना आणि शेअर्सची निवड अ‍ॅबाक्कसच्या गुंतवणूक तत्त्वज्ञानानुसार आणि त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण मीट्स (MEETS) फ्रेमवर्कद्वारे केली जाते.




## बजाज समूहाची शंभर वर्षे पूर्ण; जागतिक स्तरापर्यंतचा गौरवशाली प्रवास

**मुंबई (दै. संध्या) :**

■ पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचे कौतुक




बजाज ग्रुप या भारतातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित उद्योग समूहांपैकी एक असलेल्या समूहाने आपल्या स्थापनेची १०० वर्षे पूर्ण केली आहेत. १४८ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या मार्केट कॅपसह भारतातील सर्वात मोठ्या उद्योग समूहांपैकी एक असलेल्या बजाज समूहाने ऑटोमोबाईल, आर्थिक सेवा, ग्राहक उपयोज्य विद्युत उपकरणे आणि इंजिनिअरिंग क्षेत्रांत भक्कम उपस्थिती निर्माण केली असून आज भारतातील प्रत्येक तीन घरांपैकी एका घरापर्यंत समूहाची सेवा पोहोचली आहे.

१९२६ मध्ये स्वातंत्र्यसेनानी, समाजसुधारक आणि उद्योगपती जमनालाल बजाज यांनी मुंबईत समूहाचे पहिले कार्यालय स्थापन केले. महात्मा गांधींचे 'पाचवे मानसपुत्र' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमनालाल बजाज यांच्या विचारसरणीवर उभा राहिलेला हा समूह आज १०० हून अधिक कंपन्यांद्वारे १०० पेक्षा जास्त देशांमध्ये कार्यरत आहे. समूहात सध्या १ लाख ३० हजारांहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत.

राष्ट्रनिर्मितीत बजाज समूहाच्या योगदानाची दखल घेत पंतप्रधान Narendra Modi यांनी शुभेच्छा संदेश पाठविला. त्यांनी म्हटले की, "१०० वर्षांचा प्रवास हा कोणत्याही संस्थेसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असतो. बजाज समूहाने बदलत्या काळानुसार स्वतःला जुळवून घेत आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारताच्या औद्योगिक आणि आर्थिक प्रवासात समूहाची भूमिका अविभाज्य राहिली आहे." पंतप्रधानांनी पुढे म्हटले की, "रोजगार निर्मिती, संशोधन, समुदाय विकास आणि सर्वसमावेशक प्रगतीसाठी बजाज समूहाने सातत्याने काम केले आहे. २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्यात अशा संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण राहणार आहे."

आज समूहात बजाज ऑटो, बजाज फिनसर्व्ह, बजाज फायनान्स, बजाज हाउसिंग फायनान्स, बजाज इलेक्ट्रिकल्स आणि मुकंद यांसारख्या प्रमुख सूचिबद्ध कंपन्यांचा समावेश आहे. समूह लवकरच हेल्थकेअर क्षेत्रातही पदार्पण करणार आहे.

## देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रास'अजितदादा पवार' यांचे नाव

**मुंबई (दै. संध्या) :**

"दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या संकल्पनेतून नाविन्यपुर्ण अशा देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली होती. देशी गायींच्या मौल्यवान व दुर्मिळ प्रजातींचे जतन, त्यांची दुग्धक्षमता वाढवणे तसेच शाश्वत शेतीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे या महत्त्वाच्या बाबींवर या केंद्रामार्फत कार्य सुरू आहे. त्यांच्या पश्चात या केंद्रास त्यांचे नाव देऊन त्यांच्या कार्याची व स्मृतीची जपणूक करण्यात आली" असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या केंद्रास अजितदादा पवार यांचे नाव देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी महाविद्यालय, पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे "अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र" असे नामकरण करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय (क्र. 202605131138212501) कृषी विभागाने जारी केला आहे.

देशी गायींचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन, सुधारणा आणि संशोधन करण्याच्या उद्देशाने पुणे येथील कृषी महाविद्यालयात देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली होती. या केंद्राच्या बळकटीकरणालाही यापूर्वी शासनाने मान्यता दिली होती.

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद यांच्या १२२ व्या बैठकीत या केंद्राला "अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र" असे नाव देण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, "देशी गायींचे संवर्धन, संशोधन आणि प्रशिक्षणाला चालना देण्यासाठी राज्य शासन सक्षमपणे काम करत आहे. पुण्यातील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राला दिवंगत उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांचे नाव देण्यात आल्याने या कार्याला आणखी नवी ओळख आणि बळ मिळेल.

## व्हीआयपी दौऱ्यातील ताफा आता निम्म्यावर; पुणे पोलिसांचा निर्णय

**पुणे (दै. संध्या) :**

पुण्यात येणाऱ्या व्हीआयपी दौऱ्यासाठी रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांचा ताफा आता निम्म्यावर येणार आहेत. इंधन बचत, सरकारी खर्चावर नियंत्रण आणि साधेपणाला प्राधान्य देण्याच्या राज्य व केंद्र सरकारच्या भूमिकेनुसार पुणे पोलिसांनी हा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन आणि परकीय चलन बचतीसाठी केलेल्या आवाहनानंतर राज्य सरकारनेही विविध उपाययोजना हाती घेतल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या तात्काळ प्रभावाने कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बाहेरच्या दौऱ्यांदरम्यान निर्धारित संख्येपेक्षा अधिक वाहने ताफ्यात नसतील, याची जबाबदारी संबंधित पोलिस आयुक्त आणि पोलिस अधीक्षकांवर सोपविण्यात आली आहे. त्यानुसार आता पुण्यात देखील ताफ्यातील वाहने कमी होणार आहेत. याबाबत पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले की, पूर्वी एखाद्या व्हीआयपी दौऱ्यासाठी सुरक्षा आणि राज शिष्टाचारनुसार साधारण १२ ते १३ वाहनांचा ताफा ठेवला जात होता. मात्र, आता ही संख्या कमी करून केवळ ५ ते ६ वाहनांपर्यंत मर्यादित करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, अनेक व्हीआयपी व्यक्ती स्वतःहून फोन करून आपल्या दौऱ्यात कमीत कमी वाहनांचा वापर करण्याची विनंती करत असल्याचेही आयुक्तांनी नमूद केले.

## कचरा संकलनासाठी डेपोची ३ हजार चौ.फु. जागा

**पुणे (दै. संध्या) :**

बालेवाडी परिसरातील कचरा संकलन केंद्रासाठी जागेची कमतरता भासत असल्याने पीएमपी बस डेपोची मोकळी जागा उपलब्ध करून देण्याचा आली आहे. आज (ता. १४) स्थायी समितीच्या बैठकीत हा निर्णय घेतला आहे. बाणेर-बालेवाडी भागातील रहिवाशांची संख्या, बाजारपेठ विस्तारल्याने कचरा निर्माण होण्याचे प्रमाण वाढले आहे. सोसायट्या, बाजारपेठेतून कचरा गोळा केल्यानंतर तो बालेवाडी येथील सेवा रस्त्याच्या लगत संकलित केले जातो. त्यानंतर हा वर्गीकरण केलेला कचरा विविध कचरा प्रकल्पांवर पाठवला जातो. सध्या कचरा संकलनासाठी उपलब्ध असलेली जागा कमी पडत आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्गालगत कचरा विखुरला जाऊन या परिसरात अस्वच्छता वाढत आहे.

# भारताची पुढील आर्थिक भरारी एआयच्याच जोरावर

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

आर्टिफिशिअल इंटेलिजन्स प्रायोगिकतेच्या पलीकडे जाऊन राष्ट्रीय वाढीला पाठबळ देणारी पायाभूत शक्ती होण्यास सज्ज असल्यामुळे भारत आर्थिक रूपांतरणाच्या एका निर्णायक टप्प्यात प्रवेश करणार आहे, असा निष्कर्ष आयबीएम इन्स्टिट्यूट फॉर बिझनेस व्हॅल्यू आणि इंडियाएआय यांच्याद्वारे करण्यात आलेल्या एका नवीन अभ्यासाद्वारे काढण्यात आला आहे. २०३० सालापर्यंत एआय भारताच्या अर्थव्यवस्थेत ५०० अब्ज डॉलर्सहून अधिक योगदान देऊ शकेल असे या संशोधनातून पुढे आले आहे, त्यामुळे जगातील सर्वात गतीशील एआय-प्रेरित अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा समावेश होणार आहे. 'फ्रॉम प्रॉमिस टू पॉवर: हाउ एआय इज रिडिफायनिंग इंडियाज इकनॉमिक फ्युचर' या शीर्षकाखाली करण्यात आलेल्या या अभ्यासामध्ये महत्त्वाकांक्षा व तत्पर कृतीची आवश्यकता यांच्यातील प्रभावी संयोग अधोरेखित करण्यात आला आहे. एआयमधील गुंतवणूक भारताच्या जीडीपी वाढीवर थेट प्रभाव टाकणार असल्याचे मत उद्योगक्षेत्रात नेतृत्वाची भूमिका बजावणाऱ्या पाचपैकी चार जणांनी व्यक्त केले आहे, तर भारत २०३० सालापर्यंत आघाडीचे एआय राष्ट्र म्हणून उदयाला येणार असल्याचा विश्वास ७३ टक्के उद्योजकांनी व्यक्त केला आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात सविस्तर वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालक संगिता सुरेश इथापे व कल्पना प्रभाकर रेपाळे यांचे मालकीची आहे. सदरची मिळकत ही विद्यमान मालक यांचे प्रत्यक्ष ताबे वहिवाटीस असुन, तिची विक्री करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार असल्याचा भरवसा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. सदरील मिळकतीमध्ये मुळ मालकांव्यतिरीक्त कोणाचाही हक्क व अधिकार नाही. सदरील मिळकतीबाबत विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना मिळकत कायम खुष खरेदी देण्याचे निश्चित केलेले आहे.

सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचे तोंडी अथवा लेखी करारमदार, खरेदी, अदलाबदल, गहाण, दान, ट्रस्ट, विकसनाचे अधिकार, वारसाहक्क, मृत्युपत्र, ताबा, लिसपेन्डन्स, लायसेन्स, लीन, मेन्टेनन्स, भाडेपट्टा, कुळ, पोटगी, अन्य वहिवाट अथवा अन्य हक्कहितसंबंध अथवा कुलमुखत्यारपत्राद्वारे अथवा अग्रहक्काने कोणतेही हक्क असल्यास त्यांनी सदर नोटिस प्रसिद्ध होताच १० दिवसांचे आत कागदपत्रांनिशी आमच्याकडे लेखी कळवून खात्री करून द्यावी. अन्यथा त्यांनी त्यांचे तथाकथित हक्क हितसंबंध जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार करतील व तथाकथित हक्क हितसंबंध आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

तुकडी पुणे, पोट तुकडी जुन्नर, ता. जुन्नर, मे. दुय्यम निबंधक साहेब, नारायणगांव, यांचे हद्दीतील जिल्हा परिषद पुणे, तालुका पंचायत समिती जुन्नर येथील गाव मौजे येडगाव, ता. जुन्नर, जि. पुणे येथील गट क्र. २०३/३/अ क्षेत्र ०० हे ८८ आर, पो.ख. ०० हे १७ आर, एकुण ०१ हे. ०५ आर, आकार ०१ रू. ४४ पैसे यापैकी संगिता सुरेश इथापे व कल्पना प्रभाकर रेपाळे यांचे हिश्याचे क्षेत्र ०० हे १६ आर, पो. ख. १७ आर, एकुण ०० हे. ३३ आर, आकार ०० रू. २६ पैसे.

येणेप्रमाणे मिळकत कोणतेही हक्क राखून न ठेवता. येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

सही/-
विश्वजीत अर्जुन थोरात
ॲडव्होकेट (बी.एसएल, एल.एल.)
पत्ता - श्री. स्वामी समर्थ संकुल, फेज ए, शॉप क्र. ११,
एस.टी. स्टॅण्ड जवळ, पुना नाशिक हायवे,
मु.पो. मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.
मो. नं ९७३०५१९०४२

### जाहीर नोटीस

तमाम लोकाना विशेषतः गांव बोरी बु।।, ता. जुन्नर, जि. पुणे व परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

आमचे आशिल शुभम रंगनाथ जाधव यांनी गाव बोरी बु।।, ता. जुन्नर, जि. पुणे येथील शेतजमीन गट नं. ३७१, ३७२/२ व ८६/२ तसेच ग.नं. ८६/२ मध्ये असलेला पाट पाणी पाळीप्रमाणे हिस्सा विहीर, इले. मोटार, पाईप लाईन व विज कनेक्शनसह या शेतजमीन मिळकती संदर्भात त्यांचे आजोबा सिताराम पाटीलबुवा जाधव यांचेपासून दि. १०/०६/२०२२ रोजी बक्षीसपत्र करुन घेतलेले आहे. सदरचे बक्षीसपत्राचा रजि. दस्त क्र. २९३३/२०२२ असा आहे. याशिवाय आमचे आशिलांचे आजोबा सिताराम पाटीलबुवा जाधव यांनी आमचे आशिलांचे नावाने बोरी बु।।, ता. जुन्नर, जि. पुणे येथील गट क्र. २८६, २२६, ९३, १२७, १०४, १२२ व गट नं. २१२ या मिळकतींमधील त्यांचा असणारा अविभक्त हिश्याचे तसेच विघ्नहर सहकारी साखर कारखाना येथील त्यांचे नावे असणारे शेअर्स याबाबत दि. ८ ऑगस्ट २०२५ रोजी मृत्युपत्र करुन दिलेले आहे त्याचा रजि. दस्त क्र. ४५०५/२०२५ असा आहे. याबाबता कोणाचा हक्क, हितसंबंध, ताबा, वाटप, गहाण, दान, पोटगी अथवा अन्य इतर अधिकार असलेस त्यांनी आमचे आशिलांची सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून सुमारे आठ दिवसांचे आत समक्ष भेट घेवून कागदपत्रांसह व पुराव्यासह खात्री पटवून द्यावी. सदरचे मुदतीत कोणाची हरकत आली नाही तर त्यांनी त्यांचा असणारा हक्क, हितसंबंध स्वखुशीने सोडून दिलेला आहे असे समजण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून सदरचे जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दि. /०५/२०२५
शुभम रंगनाथ जाधव रा. बोरी
बुद्रूक, ता. जुन्नर, जि. पुणे
तर्फे ॲडव्होकेट
श्री. बाबाजी केशव खोत
रा. परदेशपुरा, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे.
मोबा. ८७६६५५७०८३

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

### ई–निविदा सुचना

महावितरणतर्फे कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग कार्यालय पुणे अंतर्गत महावितरणचे विविध कार्यालय/उपकेंद्र येथील स्थापत्य दुरुस्तीची/नवीन कामे करणेसाठी महावितरणमधील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून T-007/2026-27 ते T-013/2026-27 साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरणच्या संकेतस्थळावर (https://etender.mahadiscom.in/eatApp) दि. १५.०५.२०२६ ते २२.०५.२०२६ पर्यंत दुपारी १३:०० वाजे पर्यंत उपलब्ध आहेत. तसेच निविदा दि. २२.०५.२०२६ रोजी दुपारी १५:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा दि. २२.०५.२०२६ रोजी १५:३० वाजता शक्य असल्यास उघडण्यात येतील.

निविदासंदर्भात अधिक माहितीसाठी अति. कार्यकारी अभियंता (स्था) विभाग पुणे भ्रमणध्वनी क्र. ७८७५७६७८२४ वर संपर्क साधावा. निमस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, महावितरण च्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करून घ्यावी. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुद्धी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील "Announcements" मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

स्वा/-
कार्यकारी अभियंता (स्था),
स्थापत्य विभाग, पुणे.

PRO No. PRO/PZ/047/2026-27

### पुणे महानगरपालिका

पुणे अद्वितीय & Unique

फेर निविदा जाहिरात

विक्री कालावधी दिनांक :- १५/०५/२०२६ ते २२/०५/२०२६ दुपारी २:३० पर्यंत

स्विकृती दिनांक :-१५/०५/२०२६ ते २२/०५/२०२६ दुपारी २:३० पर्यंत

तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक :-२५/०५/२०२६ दुपारी ३:३० वा.

| अ. क्र. | निविदा.क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रु. | अंदाजित पूर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/ VEHICLE /2025/180 | मोटार वाहन विभाग | पुणे महानगरपालिकेकडील वाहनांच्या दैनंदिन दुरूस्तीसाठी Twin Post Car elevator मशिन खरेदी करणे. | ४१५/- | ४,१७,०००/- | ४,१७०/- | १ वर्ष/टेंडर रक्कम संपेपर्यंत | श्री. संदीप चौगुले ९६८९९३०१२६<br>श्री. प्रविण वाढणे ९६८९९८५४६२ |

अ) पुणे म.न.पा. ची वरील कामे ही अनुभवी/म.न.पा. मान्यता प्राप्त/शासन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडुन (कामासाठीच्या पुर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमुद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.

ब) सदर कामांबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकिट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.


ड) ऑनलाईन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती/प्रशिक्षण टेंडर सेल विभाग पुणे महानगरपालिका येथे मिळेल.

ई) कार्यालयीन आदेश क्र. अतीमआ (वि)/३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम इ.सी.एस./आर.टी.जी.एस./ एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फतच स्विकारण्यात येणार आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता (यांत्रिकी)
मोटार वाहन विभाग
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. १/१२२ दि. १४/०५/२०२६

## थोडक्यात पण महत्वाचे...




## आरपीआय कामगार आघाडीचे अध्यक्ष अनिल मोरे यांची धारदार शस्त्राने हत्या

पिंपरी (दैनिक संध्या) : आरपीआय कामगार आघाडी महाराष्ट्राचे अध्यक्ष अनिल मोरे यांची मोशी परिसरात धारदार शस्त्राने निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना रात्री घडली. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड शहरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मोशी येथील युवराज रेस्टॉरंट अँड बार येथे रात्री सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास अनिल मोरे यांच्यावर अज्ञात आरोपींनी धारदार शस्त्राने सपासप वार केले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून मोठ्या प्रमाणात आरपीआय कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. दरम्यान, अनिल मोरे यांच्या पार्थिवावर यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे शवविच्छेदन करण्यात आले. “जोपर्यंत मारेकऱ्यांना अटक होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही,” असा इशारा आरपीआय कामगार आघाडीच्या कार्यकर्त्यांनी दिला आहे. या प्रकरणी पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुरावे तपासले जात असून आरोपींचा शोध सुरू आहे.

## महापालिकेच्या प्रभाग समित्यांची पुनर्रचना; 10 क्षेत्रीय कार्यालयांची स्थापना

■ प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाला दिले किल्ल्याचे नाव, आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांच्या स्वाक्षरीने आदेश जारी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासनिक कामकाजाची कार्यक्षमता वाढविणे, नागरिकांना अधिक सुलभ व तत्पर सेवा उपलब्ध करून देणे तसेच वाढती लोकसंख्या व वाढलेला भौगोलिक कार्यक्षेत्राचा विस्तार विचारात घेता महानगरपालिकेच्या विद्यमान ८ प्रभाग समित्यांचे (क्षेत्रीय कार्यालये) पुनर्रचना करून एकूण १० प्रभाग समित्या (क्षेत्रीय कार्यालये) स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या स्वाक्षरीने आदेश जारी करण्यात आला आहे. प्रभाग समित्यांचे कार्यालयांना किल्ल्यांचे नाव देखील देण्यात आले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९-अ मध्ये लोकसंख्येच्या प्रमाणानुसार प्रभाग समित्यांची स्थापना करण्याचे प्रावधान आहे. त्या अनुषंगाने प्रशासनिक सोयीसाठी व नागरिकाभिमुख सेवा अधिक परिणामकारकपणे देण्यासाठी महानगरपालिकेच्या विद्यमान ८ प्रभाग समित्यांचे पुनर्रचना करून एकूण १० प्रभाग समित्या स्थापन करण्याबाबत १३ मार्च २०२६ रोजी झालेल्या महापालिका सभेत निर्णय घेण्यात आलेला होता. त्यानुसार प्रभाग समित्यांचे पुनर्रचना करून पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अन्वये ३२ निवडणूक प्रभागांची विभागणीदेखील प्रभागनिहाय करण्यात आली आहे. प्रभाग समित्यांच्या पुनर्रचनेबाबतचा निर्णय २५ मे २०२६ पासून लागू होणार आहे, असेदेखील आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

**क्षेत्रीय कार्यालयाचे नाव, पत्ता व त्या अंतर्गत येणारे प्रभाग क्रमांक**

अ क्षेत्रीय कार्यालय (राजगड ) - संत ज्ञानेश्वर चौक, निगडी प्राधिकरण, निगडी ४११०४४ - प्रभाग क्र. १३,१४ व १५

ब क्षेत्रीय कार्यालय (सिंहगड ) - लिंक रोड, एल प्रो कंपनी आवार, चिंचवडगाव ४११०३३ - प्रभाग क्र. १७,१८ व १९

क क्षेत्रीय कार्यालय (विजयदुर्ग ) - हॉकी स्टेडियम शेजारी, नेहरूनगर, भोसरी ४११०२६ - प्रभाग क्र. २, ९ व १०

ड क्षेत्रीय कार्यालय (देवगिरी) - औंध-रावेत रोड, रहाटणी ४११०१७ - प्रभाग क्र. २१, २७, २८ व २९

ई क्षेत्रीय कार्यालय (शिवनेरी) - पांजरपोळ संस्थे समोर, नाशिक रोड, भोसरी ४११०३९ - प्रभाग क्र. ३,४ व ५

फ क्षेत्रीय कार्यालय (तोरणा) - नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयाची जुनी इमारत लोकमान्य टिळक चौक, निगडी ४११०४४ - प्रभाग क्र. १,११ व १२

ग क्षेत्रीय कार्यालय (पुरंदर) - नविन प्रशासकिय इमारत, दिलिप वेंगसरकर क्रिकेट अॅकॅडमी मागे थेरगाव, पुणे-३३ - प्रभाग क्र. २२,२३ व २४

ह क्षेत्रीय कार्यालय (प्रतापगड) - कासारवाडी येथील महिला आय.टी.आय इमारत - प्रभाग क्र. ३०,३१ व ३२

ज क्षेत्रीय कार्यालय (रायगड)- स.नं २७, मनपा वाहनतळ इमारत, ताथवडे, पुणे ४११ ०३३ - प्रभाग क्र. १६,२५ व २६

ल क्षेत्रीय कार्यालय (लोहगड)- म्हाडा, प्लॉट नं ई-२, संत तुकाराम नगर, पोलिस स्टेशन समोर, पिंपरी पुणे ४११ ०१८ - प्रभाग क्र. ६,७,८ व २०

# आपदा मित्र स्वयंसेवकांची प्रायोगिक तत्वावर नेमणूक करण्यास मंजुरी



पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका विधी समिती सभापती सुजाता बोराटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विधी समिती सभेत पावसाळा कालावधीसाठी प्रशिक्षित आणि अनुभवी “आपदा मित्र” स्वयंसेवकांची प्रायोगिक तत्वावर नियुक्ती करण्याच्या विषयास आज मंजुरी देण्यात आली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे पार पडलेल्या या बैठकीस विधी समिती सदस्य ज्ञानेश्वर जगताप, विनायक गायकवाड, कुंदा भिसे, श्रुती डोळस, कुशाग्र कदम, शेखर चिंचवडे, वर्षा जगताप, तुषार सहाणे यांच्यासह नगरसचिव मुकेश कोळप, उप आयुक्त संदीप खोत, राजेश आगळे, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, कार्यकारी अभियंता शिरीष पोरेड्डी, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल आदी उपस्थित होते.

महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कामकाज अधिक परिणामकारक, गतिमान आणि सक्षम होण्यासाठी ही नियुक्ती करण्यात येणार असून, मान्सूनपूर्व तयारी २०२६ अंतर्गत पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या संभाव्य आपत्कालीन परिस्थिती, पूरस्थिती, पाणी साचणे, झाडे पडणे, दुर्घटना तसेच नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही यंत्रणा महत्त्वाची ठरणार आहे.

याअंतर्गत शासनमान्य संस्थांकडून आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेतलेले “आपदा मित्र”, राज्य अग्निशमन दल तसेच नागरी संरक्षण दलातील प्रशिक्षित स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून पुढील पाच महिन्यांच्या कालावधीसाठी किमान ५० अनुभवी आपदा मित्र स्वयंसेवकांची मानधन तत्वावर नियुक्ती करण्यात येणार असून, या स्वयंसेवकांना कामगार कल्याण विभागाकडील कंत्राटी कामगारांच्या किमान वेतन दरानुसार मानधन अदा करण्यात येणार आहे.

हे स्वयंसेवक आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या समन्वयाने विविध आपत्कालीन घटनांमध्ये तातडीने प्रतिसाद देणे, बचावकार्यामध्ये मदत करणे, नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविणे, पूरपरिस्थितीमध्ये सहाय्य करणे, आपत्कालीन यंत्रणांना सहकार्य करणे आदी जबाबदाऱ्या पार पाडणार आहेत. त्यामुळे महानगरपालिकेच्या आपत्ती प्रतिसाद क्षमतेत मोठी वाढ होणार आहे.

## सामूहिक अत्याचाराचा आरोप; सात जणांविरोधात गुन्हा दाखल

पिंपरी (दै. संध्या)

आळंदी परिसरात एका महिलेला घरात घुसून मारहाण करत सामूहिक लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी दिघी पोलीस ठाण्यात सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, ७ एप्रिल रोजी आरोपी तिच्या घरात जबरदस्तीने घुसले. यावेळी त्यांनी महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून घेत मारहाण केली. तसेच जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

घर आमच्या नावावर करून दे, अन्यथा तुला आणि तुझ्या कुटुंबाला गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी आरोपींनी दिल्याचाही दावा फिर्यादीत करण्यात आला आहे. यापूर्वीही चार ते पाच महिन्यांपूर्वी आरोपी पीडितेच्या घरी आले होते. त्यावेळीही जबरदस्तीने शारीरिक छळ करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच पीडितेच्या नातेवाईकांशी गैरवर्तन करून सोशल मीडियावर बदनामी करण्याची धमकी दिल्याचाही उल्लेख तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी अभिमन्यू आंधळे, नारायण खंदारे, श्याम महाराज राठोड, राहुल चोरेडिया, कालिनाथ गुलाबराव घुले, युवराज खरमाटे आणि एका महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिघी पोलिसांनी गुन्हा नोंदवत घटनेचा अधिक तपास सुरू केला आहे.

## पिंपरी चिंचवडमध्ये १६ मे पासून घरयादी व घरगणनेला प्रारंभ

**नागरिकांनी अचूक माहिती देऊन सहकार्य करावे**

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड शहरात जनगणना २०२७ च्या अनुषंगाने पहिल्या टप्प्याच्या प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरात घरयादी व घरगणनेच्या कामाला १६ मे २०२६ पासून अधिकृत सुरुवात होणार आहे. ही मोहीम १४ जून २०२६ पर्यंत चालणार असून, या कालावधीत प्रगणक घरोघरी भेट देऊन नागरिकांकडून आवश्यक माहिती संकलित करणार आहेत.

प्रगणक जेव्हा आपल्या घरी येतील तेव्हा त्यांना योग्य आणि अचूक माहिती देऊन पूर्ण सहकार्य करावे. घरयादी व घरगणना ही जनगणनेची अत्यंत महत्त्वाची प्राथमिक पायरी मानली जाते. यामध्ये घरांची संख्या, रहिवाशांची माहिती, मूलभूत सुविधा आदी बाबींची नोंद केली जाते.

या संकलित माहितीच्या आधारे शासन विविध विकास योजना, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक कल्याणाशी संबंधित धोरणे आखते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने या प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे.

याबाबत पिंपरी चिंचवड महापालिका उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले की, प्रगणकांकडून विचारली जाणारी सर्व माहिती ही पूर्णपणे गोपनीय राखली जाते आणि ती केवळ शासकीय धोरणे व विकास नियोजनासाठीच वापरली जाते. नागरिकांच्या वैयक्तिक माहितीची सुरक्षितता ही शासनाची सर्वोच्च जबाबदारी आहे. त्यामुळे कोणतीही भीती किंवा शंका न बाळगता प्रत्येक नागरिकाने प्रामाणिकपणे आणि अचूक माहिती देऊन या प्रक्रियेत सहकार्य करावे.आपला छोटासा सहभागही शहराच्या आणि देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

देशाच्या विकासासाठी अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह माहिती अत्यंत महत्त्वाची आहे. जनगणना ही केवळ आकडेवारी संकलनाची प्रक्रिया नसून, भविष्यातील विकास आराखड्याचा पाया आहे. प्रत्येक नागरिकाचा सक्रिय आणि जबाबदारीपूर्ण सहभाग हा देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मोलाचा ठरेल. त्यामुळे सर्व पिंपरी चिंचवडकरांनी प्रामाणिकपणे व अचूक माहिती देऊन या राष्ट्रीय कार्यात योगदान द्यावे, असे आवाहन आहे.

**- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

घरयादी व घरगणना ही केवळ औपचारिक प्रक्रिया नसून, देशाच्या भविष्यातील नियोजनाचा भक्कम पाया आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवडकरांनी सक्रिय सहभाग नोंदवून ही मोहीम यशस्वी करावी

**- कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## स्वर्गीय प्रमोदजी महाजन स्वच्छ व हरित पिंपरी चिंचवड शहर योजना सुरू करणार

*महापौर रवि लांडगे यांची घोषणा : महापौरांच्या हस्ते गणेश तलाव, सेक्टर २६, स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान येथे वृक्षारोपण*



पिंपरी (दै. संध्या)

स्वर्गीय प्रमोदजी महाजन यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ‘स्वच्छ व हरित पिंपरी चिंचवड शहर योजना’ लवकरच सुरू करण्यात येईल, ही योजना महापालिका आणि नागरिकांच्या लोकसहभागातून यशस्वी करण्यात येईल, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पर्यावरण संवर्धन, शहरातील हरित क्षेत्र वाढविणे आणि नागरिकांमध्ये वृक्षसंवर्धनाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने निगडी प्राधिकरण येथील गणेश तलाव, स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान येथे आयोजित नियोजन बैठकीत महापौर रवि लांडगे बोलत होते.

या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगरसदस्या शैलजा मोरे, नगरसदस्य अमित गावडे,अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे,मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, सह शहर अभियंता बापू गायकवाड, उपायुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता सुनील पवार, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते प्रा.नामदेव जाधव,निलेश शिंदे, सुर्यकांत मुथियान,विजय नाईक यासह निगडी प्राधिकरण रेसिडेंट फोरमचे पदाधिकारी, पर्यावरणप्रेमी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे यावेळी म्हणाले, वाढते शहरीकरण आणि बदलते हवामान लक्षात घेता पर्यावरण संतुलन राखणे ही येत्या काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरात किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. महापालिका नागरिकांना रोपे, खत तसेच आवश्यक तांत्रिक सहकार्य उपलब्ध करून देणार आहे. शहरात पुढील काळात तब्बल २ लाख वृक्षारोपण करण्याचा मानस असून, त्यासाठी विविध सामाजिक संस्था, पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग घेतला जाणार आहे, असे देखील त्यांनी सांगितले.

आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी म्हणाले, महापालिकेच्या राखीव भूखंडांच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्याचे नियोजन आहे. तसेच शहरातील निवडक ठिकाणी ‘डेन्स फॉरेस्ट’ विकसित करण्याची संकल्पना राबविण्यात येणार असून, त्यामुळे शहरातील हरित क्षेत्रात मोठी वाढ तर तापमानात घट होईल. पर्यावरणपूरक आणि शाश्वत शहर उभारण्यासाठी महापालिका विविध उपक्रम प्रभावीपणे राबवत असल्याचे देखील त्यांनी नमूद केले.

यावेळी महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते वृक्षारोपण देखील करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले, तर अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## पुणे-पिंपरीत उष्णतेचा कहर; तापमान ४२ अंशांवर पोहोचले

पिंपरी (दै. संध्या)

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात मागील काही दिवसांपासून उन्हाचा तडाखा तीव्र झाल्याने नागरिक हैराण झाले आहेत. वाढत्या तापमानामुळे शहरात उकाडाही प्रचंड वाढला असून, दैनंदिन जनजीवनावर त्याचा परिणाम होताना दिसत आहे. विशेषत: दुपारच्या वेळेत रस्त्यांवरील वर्दळ कमी झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. नागरिक तीव्र उन्हामुळे शक्यतो घराबाहेर पडणे टाळत असून, अत्यावश्यक कामांशिवाय बाहेर न जाण्याला प्राधान्य देत आहेत. शहरातील बांधकाम मजूर, डिलिव्हरी कर्मचारी, वाहतूक कर्मचारी आणि अंगमेहनतीची कामे करणाऱ्या कामगारांना या उष्णतेचा सर्वाधिक फटका बसत आहे. दुपारच्या वेळी अनेक भागांमध्ये रस्ते ओस पडलेले दिसून आले. नागरिकांकडून थंड पेये, उसाचा रस, ताक आणि फळांच्या रसाला मोठी मागणी वाढली आहे. तसेच बाजारपेठांमध्ये छत्री, टोपी आणि सनस्क्रीनचा वापरही वाढला आहे. पुणे शहराचे कमाल तापमान मागील तीन ते चार दिवसांपासून 41 ते 42 अंश सेल्सिअसच्या आसपास नोंदवले जात होते. बुधवारी तापमानात किंचित घट होऊन ते 39 अंशांवर आले. मात्र, उकाड्याची तीव्रता कायम असल्याने नागरिकांना फारसा दिलासा मिळालेला नाही. लोहगाव परिसरात तर तापमानाचा पारा 44 अंशांपर्यंत पोहोचला होता. बुधवारी त्यात काहीशी घट होऊन तापमान 41 अंशांवर नोंदवले गेले. पिंपरी-चिंचवड शहरातही अशीच परिस्थिती असून, दुपारच्या वेळेत प्रमुख चौक आणि रस्त्यांवर तुलनेने कमी गर्दी दिसून आली.

# ७ हजाराहून अधिक तरुणाईच्या स्वप्नांना मिळाले रोजगाराचे पंख!

**आमदार शंकर जगताप यांच्या पुढाकाराने नवी सांगवीतील 'रोजगार मेळाव्यात' १५४७८ पदांसाठी थेट मुलाखती : तरुणांच्या कौशल्याच्या बळावरच भारताची उभारणी : आमदार जगताप**



पिंपरी (दै. संध्या)

चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांच्या पुढाकारातून युवकांच्या स्वप्नांना रोजगारांचे पंख देण्यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय विभागीय रोजगार मेळावा गुरुवारी (दि. १४) पार पडला. चिंचवड मतदार संघातील नवी सांगवी येथील न्यू मिलेनियम इंग्लिश स्कूलमध्ये पार पडलेल्या आजच्या मेळाव्यामध्ये १५४७८ युवक युवतींनी रोजगारासाठी नोंदणी केली विविध १२० कंपन्यां मध्ये या युवकांच्या मुलाखती पार पडल्या. यामध्ये ७ हजाराहून अधिक युवक युवतींना रोजगाराची संधी प्राप्त होणार आहे.

दरम्यान "आजच्या बदलत्या काळात केवळ पदवी असून चालत नाही, तर त्याला 'स्किल डेव्हलपमेंट'ची अर्थात कौशल्य विकास जोड असणे ही काळाची गरज बनली आहे. भारताला आत्मनिर्भर आणि विकसित बनवण्याचे स्वप्न देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि आपल्या महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पाहत आहे. हे स्वप्न केवळ आपल्या युवाशक्तीच्या आणि त्यांच्या हातातील कौशल्याच्या बळावरच साकार होऊ शकते," असा विश्वास आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केला.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, प्रतिभा महिला प्रतिष्ठान आणि चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात ते बोलत होते. या रोजगार मेळाव्याचे उद्घाटन पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, कौशल्य रोजगार उद्योजकता विभाग उपायुक्त अनुपमा पवार, जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त सु. रा. वराडे, पिंपरी चिंचवड महापालिका पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी व्यासपीठावर स्थानिक पदाधिकारी तसेच विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी आमदार जगताप म्हणाले, "आज पुणे हे जागतिक पातळीवर 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर' (जीसीसी) म्हणून उदयास येत आहे. या पुण्याच्या ग्रोथ हब साठी केंद्र सरकारकडून ६,००० कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे, कारण येथे रोजगाराच्या उदंड संधी आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नुकत्याच सुरू झालेल्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे पुणे-मुंबई अंतर कमी झाले नसून, ती पुण्याच्या विकासाची 'अपॉर्च्युनिटी लिंक' ठरली आहे." "भारताच्या एकूण जीडीपीमध्ये महाराष्ट्राचा वाटा १५ टक्के असून, यामध्ये एमएसएमई आणि स्टार्टअप्सचे योगदान मोठे आहे. जेव्हा राज्याचे नेतृत्व दावोस येथे जाते, तेव्हा देशात येणाऱ्या एकूण विदेशी गुंतवणुकीपैकी एकटा महाराष्ट्र ३७ टक्के गुंतवणूक खेचून आणतो. मुंबईनंतर पुण्यात गुंतवणुकीचा ओघ सर्वाधिक असून, या उद्योगांना कुशल मनुष्यबळ पुरवण्याचे काम या रोजगार मेळाव्यातून होत आहे," असेही आमदार जगताप यांनी स्पष्ट केले. गेल्या ११ वर्षांपासून असे रोजगार मेळावे आम्ही आयोजित करत असल्याचे सांगून आमदार जगताप म्हणाले, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत रोजगाराची संधी पोहोचावी, या 'अंत्योदय' भावनेतून आम्ही काम करत आहेत," "महाराष्ट्र सरकार ५ ट्रिलियन इकॉनॉमीचे उद्दिष्ट ठेवून काम करत असून राज्याची अर्थव्यवस्था सध्या ६६ अब्ज डॉलरवर पोहोचली असल्याचे आमदार जगताप म्हणाले. उपायुक्त अनुपमा पवार म्हणाल्या की, "रोजगार मेळावा ही तरुणांसाठी यशाची पहिली पायरी आहे. मिळालेल्या संधीचा स्वीकार करून प्रवासाला सुरुवात करावी आणि मग ध्येय गाठावे. मात्र, आजच्या युवा पिढीला 'इन्स्टंट' यश हवे असते. तरुणांनी एखाद्या संस्थेत प्रवेश करून आधी स्वतःला सिद्ध करावे आणि मग पंख पसरावे. आधीच पंख पसरून भरारी घेण्याचा प्रयत्न केल्यास धडपडण्याची शक्यता अधिक असते." शिक्षण घेता घेता विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात, हाच केंद्र आणि राज्य सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या भाषणात पवार यांनी दिवंगत लोकनेते आमदार लक्ष्मण जगताप यांच्या आठवणींना उजाळा दिला. "युवकांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी दिवंगत लक्ष्मण जगताप नेहमीच प्रयत्नशील असायचे. गंभीर आजारपणाशी झुंज देत असतानाही, गेल्या वेळच्या रोजगार मेळाव्यात ते ऑनलाइन सहभागी झाले होते. यावरूनच त्यांची युवकांविषयीची असलेली अथांग तळमळ दिसून आली," अशा भावूक शब्दांत त्यांनी लक्ष्मण जगताप यांच्या कार्याचा गौरव केला. महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी म्हणाले की, "हा रोजगार मेळावा खऱ्या अर्थाने येथे आलेल्या उमेदवारांच्या आयुष्यात आनंदाचा क्षण घेऊन आला आहे. घरातील सदस्याला नोकरी मिळणे कुटुंबासाठी किती महत्त्वाचे असते, हे मी जाणतो. आई-वडिलांनी कष्टाने दिलेल्या शिक्षणाचे उमेदवारांनी सोने करावे." स्वतःचे उदाहरण देत आयुक्त म्हणाले, "मी एका छोट्या गावातून आलेलो आहे. त्यामुळे पुण्यासारख्या औद्योगिक आणि शैक्षणिक हबमध्ये राहणारा येथील प्रत्येक तरुण भाग्यवान आहे, कारण त्याला शिक्षण, रोजगार आणि इंडस्ट्री सगळं एकाच ठिकाणी उपलब्ध झालं आहे. आजच्या उद्योगांना कुशल मनुष्यबळाची गरज आहे. केवळ नोकरी मिळवणे पुरेसे नाही, तर ती टिकवणे आणि कामगिरी सिद्ध करणे महत्त्वाचे आहे. ज्या भागात कुशल मॅनपावर उपलब्ध असते, तिथून कंपन्या कधीही स्थलांतरित होत नाहीत. त्यामुळे शासन आणि लोकप्रतिनिधींसमोर आगामी काळात 'स्किल मॅनपावर' घडवण्याचे मोठे आव्हान असेल." कार्यक्रमांमध्ये कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री अॅड. मंगल प्रभात लोढा यांचा शुभ संदेश कार्यक्रमात वाचून दाखवण्यात आला. कार्यक्रमाच्या संयोजनासाठी मनोजकुमार मारकड, भारत मदने यांनी पुढाकार घेतला . सहभागी सर्व युवक-युवतींना आयोजकांच्या वतीने विशेष 'सहभाग प्रमाणपत्र' देऊन गौरवण्यात आले. सूत्रसंचालन अक्षय मोरे यांनी केले. आभार सहाय्यक आयुक्त सु.रा. वराडे यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये प्लेसमेंट ड्राइव्हला प्रतिसाद

सासवड (दैनिक संध्या) : सासवड येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या सेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी येथे दिनांक १३ मे २०२६ रोजी कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह उत्साहात आयोजित करण्यात आला. या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये नामांकित औषधनिर्माण कंपनी Emcure Pharmaceuticals सहभागी झाली होती. कंपनीकडून "सेल्स – मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह" या पदासाठी बी.फार्मसी (२०२४, २०२५ व २०२६ उत्तीर्ण) विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया घेण्यात आली. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मुलाखत प्रक्रियेद्वारे विद्यार्थ्यांच्या संवादकौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास व औषध विक्री क्षेत्रातील ज्ञानाचे मूल्यमापन करण्यात आले. विद्यार्थ्यांना करिअरच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील असल्याचे प्राचार्य डॉ. आर. एस. चव्हाण यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी उद्योग क्षेत्रातील संधींचा लाभ घेऊन स्वतःचे कौशल्य विकसित करावे व व्यावसायिक क्षेत्रात यश संपादन करावे, असे आवाहन उपप्राचार्या डॉ. स्मिता पवार यांनी केले. या प्लेसमेंट ड्राइव्हचे समन्वयक म्हणून डॉ. जी. बी. निगडे व सौ. ए. ए. जावळकर यांनी कार्य पाहिले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

### राहता शहर गुन्हेगारांच्या ताब्यात? पोलिसांचा धाक नाही; नगराध्यक्ष संतापले

अहिल्यानगर (दैनिक संध्या) : राहता शहरांमध्ये कायदा सुव्यवस्थेचे अक्षरशा तीन तेरा वाजले आहेत याची प्रचिती सध्या येत आहे. गुन्हेगारांनी शहराला वेठीस धरल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. हत्या, छेडछाड, दिवसा चोरी, दहशत आदी प्रकार मोठ्या प्रमाणात रूप धारण करू लागले आहेत. एवढे गंभीर प्रकार घडत असूनही राहाता पोलीस प्रशासन शांत का अशा प्रकारचा सवाल नगराध्यक्ष श्री. स्वाधीन गाडेकर यांनी केला आहे. जननेचे रक्षण करायची की गुन्हेगारांचे? अशा प्रकारचा संतप्त सवाल नागरिकांमधून येत आहे. पोलिसांचे निष्क्रिय भूमिकेमुळे गुन्हेगारांचे मनोबल प्रचंड वाढल्याचे दिसून येत आहे. राहता शहरातील महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून संध्याकाळी बाहेर फिरायला निघणे ही धोक्याचे झाले आहे. पोलीस ठाण्याचा गुन्हेगारांवर अजिबात वचक राहिला नाही असे दिसून येत आहे. म्हणून राहता नगर परिषदेचे नगर अध्यक्ष यांनी निष्क्रिय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे. पोलिसांनी सुधरा नाहीतर जन आंदोलन होईल अशा प्रकारचा इशाराही नगराध्यक्ष स्वाधीन गाडेकर यांनी दिला आहे. राहता शहरातील वाढते गुन्हेगारी आणि पोलिसांची निष्क्रियता आता खपवून घेतली जाणार नाही असे त्यांनी सांगितले आहे. प्रसंगी रस्त्यावर उतरून जन आंदोलन करण्यात येईल असा इशाराही त्यांनी दिला आहे. राहता शहरांमध्ये आता जनतेचा संताप उसळून आला असून पोलीस जागे होणार की जनता रस्त्यावर उतरणार? असा सवाल नागरिक विचारत आहेत.

### NEET चं जुन्नर कनेक्शन उघड

नारायणगाव (दैनिक संध्या) : राहुरीतील डॉ. धनंजय लोखंडे याचा मित्र ओंकार शिंगोटे याला CBI ने बेड्या ठोकल्या आहेत. जुन्नर चं NEET कनेक्शन आता उघड झालं आहे. राज्यस्थान पोलिसांनी नाशिक मधील शुभम खैरनार याला अटक केल्यानंतर CBI ने चौकशी करून नीट कनेक्शनचे धागेदोरे तपासले असता पुणे राहुरी आणि आता जुन्नर कनेशन उघड झालं आहे.CBI ने ओंकार शिंगोटे याला बेड्या ठोकल्या आहेत. ओंकार शिंगोटे हा राहुरीतील डॉक्टर धनंजय लोखंडे यांचा मित्र असून कॉलेज मध्ये अॅडमिशन मिळवून देतो असे विद्यार्थ्यांना सांगत,असल्याची माहीती समोर आली आहे. पुण्यात मनीषा वाघमारे या ब्युटी पार्लर चालक महिलेला CBI ने ताब्यात घेतल्यानंतर त्यांनी वाघमारे यांचे बँक खाती तपासली असता 21 बँक खात्यातून राहुरीतील डॉ धनंजय लोखंडे आणि वाघमारे यांच्यात व्यवहार झाले आहेत. आता राहुरीतील धनंजय लोखंडे याला पोलिसांनी पुण्यातून ताब्यात घेतल्यानंतर पुण्यातूनच जुन्नर येथील ओंकार शिंगोटे यालाही ताब्यात घेण्यात आले. एकूणच नाशिकमधून शुभम खैरनारला अटक केल्यानंतर पुण्यातून मनीषा वाघमारे, धनंजय लोखंडे आणि ओंकार शिंगोटे यांना CBI ने अटक केली आहे. मनीषा वाघमारे यांच्या 21 वेगवेगळ्या बँक खात्यातून झालेल्या व्यवहाराशी धनंजय लोखंडे प्रमाणे ओंकार शिंगोटेचा काही संबंध आहे का? हे आता तपसण्यात येत आहे.

### भंडारा डोंगर मंदिरात रविवारपासून गाथा पारायण सोहळा

कान्हाटी (दैनिक संध्या) : अधिक मास निमित्त तीर्थक्षेत्र देहू येथील भंडारा डोंगर मंदिर येथे संत तुकाराम महाराज गाथा पारायण, अखंड हरिनाम सोहळा व्यासपीठ चालक प्रतीक्षा सुतार, दत्तात्रय कदम यांच्या मार्गदर्शनाने. भजन,प्रवचन, कीर्तन महोत्सवाचे आयोजन केले आहे. पाच दिवसांच्या या सोहळ्यास रविवारपासून (ता. १७) सुरूवात होत आहे. आंबी खुर्द (ता. बारामती) येथील विश्वकर्मासह भोजलिंगकाका पायी दिंडी सोहळ्याचे प्रमुख गोरक्षनाथ महाराज सुतार यांनी ही माहिती दिली. संत तुकाराम महाराज देहू संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, भागवत साळुंके, रामचंद्र इंगवले, गोरक्षनाथ सुतार यांची कीर्तनसेवा तर दत्तात्रेय कदम, संजय दिक्षीत, जयराम सुपेकर यांची प्रवचनसेवा होणार आहेत. गुरुवारी (ता. २१) सकाळी संतोष शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

### पर्यटनासाठी जाणाऱ्यांकरिता पोलीस प्रशासनाकडून सूचनांचा पाऊस

चाकण (दैनिक संध्या) : उन्हाळ्याच्या सुट्टीत नागरिक गावी किंवा पर्यटनासाठी बाहेर जातात, अशा वेळी बंद घरांची चोरी होण्याचे प्रमाण वाढते. या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाकडून नागरिकांसाठी महत्त्वाच्या सुरक्षा सूचना जारी करण्यात आल्या आहेत. बाहेरगावी जाताना घराची चावी शेजाऱ्यांकडे न देता, विश्वासू नातेवाईकांकडे देणे अपेक्षित आहे. शेजाऱ्यांना आपण कधी परतणार आहोत याची कल्पना द्या आणि संशयास्पद हालचाल दिसल्यास पोलिसांना कळविण्यास सांगा. दागिने, रोकड बँकेत ठेवा. मौल्यवान वस्तू, रोख रक्कम घरात ठेवण्याचे टाळले पाहिजे. अन्यथा बँकेच्या लॉकर मध्ये ठेवा. घराच्या मुख्य दरवाजाला लॅच प्रकारातील मजबूत कुलूप वापरले पाहिजे. घराबाहेर किंवा आत एक दिवा अथवा लाईट सुरू ठेवा, की जेणेकरून चोरट्यांना घर बंद असल्याचे वाटणार नाही. सोशल मीडियाचा वापर टाळा. गावी किंवा फिरायला गेल्याचे फोटो, लोकेशन आणि स्टेटस फेसबुक, व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्रामवर टाकणे चुकीचे वाटते. चोरटे सोशल मीडियावरही पाळत ठेवून असतात, याचे भान ठेवले पाहिजे. सोसायटीमध्ये सुरक्षा रक्षक असल्यास त्यांना सूचना देणे अपेक्षित आहे. सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत असल्याची खात्री करणे सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. एकाच वेळी अनेक घरे किंवा सोसायटीतील अनेक घरे बंद असतील, तर पोलिसांना गस्त वाढवण्याची विनंती केली पाहिजे. आपत्कालीन परिस्थितीत त्वरित ११२ या नंबरवर किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन उत्तर चाकण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम व दक्षिण महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ यांनी केले आहे.

# भीमथडी मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. फ. मुं. शिंदे यांची निवड

**राज्यस्तरीय पाचवे संमेलन २३ व २४ मे रोजी चौफुला येथे आयोजन**

दौंड (दै. संध्या)





अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषद आणि भीमथडी मराठी साहित्य प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाचव्या राज्यस्तरीय भीमथडी मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. फ. मुं. शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. तर संमेलनाचे उद्घाटक म्हणून दौंडचे आमदार अॅड. राहुल कुल यांची निवड करण्यात आल्याची माहिती संमेलनाचे मुख्य संयोजक ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी दिली.

हे राज्यस्तरीय साहित्य संमेलन दि. २३ व २४ मे २०२६ रोजी केडगाव चौफुला (ता. दौंड) येथे संपन्न होणार आहे. संमेलनास राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर तसेच आयबीएन लोकमतचे संपादक मंदार फणसे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. रोहन खवटे असून, निमंत्रक डॉ. भरत खळदकर आहेत. सहनिमंत्रक म्हणून रामभाऊ नातू कार्यरत आहेत.

संमेलनाच्या नियोजनासाठी आयोजित बैठकीस भीमथडी मराठी साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्ष बाळासाहेब मुळीक, सचिव दिपक पवार, सदस्य कैलास शेलार, राजाभाऊ जगताप, रामचंद्र नातू, महाराष्ट्र राज्य तमाशा थिएटर मालक संघटनेचे अध्यक्ष डॉ. अशोक जाधव, विनायक कांबळे, दत्तात्रय डाडर, रानकवी जगदीश वनशिव, भाऊसाहेब फडके, नितीन भागवत, आनंदा बारवकर, सुशांत जगताप, अरविंद जगताप आदी उपस्थित होते.

या साहित्य संमेलनात ग्रंथदिंडी, जलाभिषेक, उद्घाटन समारंभ, पुरस्कार वितरण, कथाकथन, नाट्यप्रयोग, परिसंवाद, कविसंमेलन तसेच समारोप समारंभ असे विविध सांस्कृतिक व साहित्यिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

प्रा. फ. मुं. शिंदे यांनी गेली पन्नास वर्षे मराठी साहित्य क्षेत्रात आपल्या लेखणीद्वारे भरीव योगदान दिले आहे. 'अवशेष', 'आदिम', 'आयुष्य वेचताना', 'कालमान', 'गणगौळण', 'जुलूस', 'फकिराचे अभंग', 'निरंतर', 'निर्वासित नक्षत्र', 'प्रार्थना', 'मिथक', 'लाकडाची फुले', 'लोकगाणी', 'वृंदगान', 'सूर्यमुद्रा', 'स्वान्त' आदी अनेक उल्लेखनीय पुस्तकांचे त्यांनी लेखन केले आहे. तसेच अनेक मराठी चित्रपटांसाठी गीत लेखनही केले आहे.

त्यांचे २७ कविता संग्रह, ३ समीक्षासंग्रह, विनोदपर गद्यसंग्रह, राजकीय उपहासिका, बुद्धजीवनावरील एकांकिका संग्रह तसेच हिंदी नाटक 'क्रांतिबा फुले'चा मराठी अनुवाद प्रकाशित झाला आहे.

प्रा. शिंदे यांना उत्कृष्ट काव्यलेखनासाठी महाराष्ट्र शासनाचा सलग तीन वेळा कवी केशवसुत पुरस्कार प्राप्त झाला असून समीक्षालेखन, विनोदपर लेखन आणि एकांकिका लेखनासाठीही त्यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. तसेच पुणे मसापचा कवी यशवंत पुरस्कार, भा. रा. तांबे पुरस्कार, दमाणी पुरस्कार, प्रियदर्शनी साहित्य पुरस्कार, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे पुरस्कार आदी अनेक मानाचे पुरस्कार त्यांनी प्राप्त केले आहेत.

सासवड येथे पार पडलेल्या ८७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे.

त्यांच्या साहित्याचा समावेश राज्यातील अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात करण्यात आला असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मराठी अभ्यासक्रमात 'सूर्यमुद्रा' या काव्यसंग्रहाचाही समावेश आहे.

## थेऊर फाट्यावर असलेला रेल्वे उड्डाणपूल अवजड वाहतुकीसाठी बनला धोकादायक!

थेऊर (दै. संध्या)

थेऊर फाट्यावर असलेला रेल्वे उड्डाणपूल अवजड वाहतुकीसाठी धोकादायक बनला असून, या थेऊर फाटा ते लोणीकंद या मार्गावरची वाहतूक अन्य मार्गावरून वळवण्याची सुचना सार्वजनिक बांधकाम प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत पंडित यांनी पुणे शहर वाहतूक शाखेला पत्राद्वारे कळवली आहे. त्यांनी वाहतूक शाखेला दिलेल्या पत्रामध्ये म्हटले आहे की, अष्टविनायक महामार्गावरील किलोमीटर ३९ ते ५६/३६८ या लोणीकंद ते थेऊर फाटा मार्गावर, किलोमीटर ५६/०४० मध्ये असलेल्या रेल्वे उड्डाणपूलाला सोलापूर रोडच्या बाजूला मोठा खड्डा पडून,त्याखालील बांधकाम साहित्याचे भरावासाठी वापरलेले वेगवेगळे थर ढिसाळ होऊन,तो मुरुम,खडी बाजूच्या भिंतीला पडलेल्या मोठ्या भेगांमधून खाली ढासळून पुला शेजारील सेवा रस्त्याच्या बाजूला मोठे ढीग साठले आहेत. त्यामुळे डांबरी पृष्ठभागाच्या थराखाली बऱ्याच भागात मोठी पोकळी निर्माण झाल्याने, या पुलावरून होणारी अवजड वाहतूक धोकादायक बनलेली आहे.

## मेडिकल व इंजिनिअरिंग प्रवेश परिक्षा साठी मोफत वर्षभर मार्गदर्शन

उरण (दै. संध्या)

मेडिकल व इंजिनिअरिंगचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा व दिनांक 20 मे रोजी महाविद्यालयात उपस्थित राहावे असे आवाहन शोभा मेमोरियल फाउंडेशन च्या वतीने श्री आशिष गुप्ता व डॉ. आमोद ठक्कर प्र. प्राचार्य वीर वाजेकर महाविद्यालय, फुंडे, उरण, यांच्याकडून करण्यात येत आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे च्या पुढाकाराने व शोभा मेमोरियल फाउंडेशन तर्फे "सुपर थर्टी" या उपक्रमा अंतर्गत बारावी सायन्स उत्तीर्ण मेडिकल आणि इंजीनियरिंग करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्षभर मोफत नीट व जेईई परीक्षेसाठी वर्षभर मोफत मार्गदर्शन मिळणार आहे.

शोभा मेमोरियल फाउंडेशन तर्फे हा उपक्रम फ्रेशभरात दहा ठिकाणी चालू आहे.

या उपक्रमा अंतर्गत उरण तालुक्यातील विज्ञान शाखेच्या सर्व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य/ शिक्षक यांची एक बैठक घेऊन उपक्रमाची माहिती दिली. त्यानंतर दिनांक 21 एप्रिल रोजी बारावी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनाही प्रकल्पाची माहिती दिली.

बारावी उत्तीर्ण झालेल्या मेडिकल व इंजिनिअरिंग प्रवेशाचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे स्वप्नपूर्ती करण्यासाठी शोभा मेमोरियल फाउंडेशन तर्फे सुपर थर्टी या उपक्रमांतर्गत वर्षभर निवासी मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

गरीब व गरजू इच्छुक विद्यार्थ्यांतील गुणवंत तीस विद्यार्थी नीट साठी व तीस विद्यार्थी जेईई परीक्षेच्या तयारीसाठी परीक्षा घेऊन निवडले जातील. परीक्षा बारावीच्या अभ्यासक्रमावर आधारित असेल. परीक्षेचे गुण व विद्यार्थ्यांची वैयक्तिक मुलाखत घेऊन निवड प्रक्रिया केली जाईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना एक वर्षासाठी निवासी प्रशिक्षण दिले जाईल, त्यामध्ये अभ्यासक्रम शिकविणे, उजळणी परीक्षा, गृहपाठ, शंका निरसन, सराव परीक्षा इत्यादी तयारी करून घेतली जाईल.

सुपर थर्टी साठी इच्छुक विद्यार्थी व त्यांचे पालक यांची बैठक दिनांक 20 मे रोजी सकाळी साडेदहा वाजता वीर वाजेकर महाविद्यालयात आयोजित केलेली आहे.

पालकांना या उपक्रमाची माहिती दिली जाईल व त्याच वेळेस विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया परीक्षा ही घेतली जाईल.



## 'नमो उद्यान' महत्त्वपूर्ण ठरणार" : नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे

आळंदी (दै. संध्या)

"आळंदी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नगरपरिषद सातत्याने प्रयत्नशील आहे. प्रभाग क्र. ०९ मधील नागरिकांना दर्जेदार आणि आधुनिक सुविधा मिळाव्यात, यासाठी सुमारे १ कोटी रुपये खर्चातून 'नमो उद्यान' उभारण्यात येत आहे. या उद्यानामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था, मुलांसाठी सुरक्षित खेळणी, महिलांसाठी फिरण्याचा ट्रॅक तसेच युवकांसाठी व्यायामाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असून हे उद्यान नागरिकांच्या आरोग्यदायी आणि आनंदी जीवनशैलीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे," असे प्रतिपादन नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी केले. आळंदी नगरपरिषदेच्या प्रभाग क्र. ०९ मध्ये नागरिकांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुमारे १ कोटी रुपये खर्चाच्या "नमो उद्यान" चे भूमिपूजन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाचे भूमिपूजन नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी माधव खांडेकर, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, सभागृह नेते सचिन गिलबिले, स्थानिक नगरसेवक दिनेश घुले, नगरसेविका अर्चना तापकीर, नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे, गोविंदा कुऱ्हाडे, रामचंद्र भोसले, सागर कुऱ्हाडे, सुरेश झोंबाडे, नगरसेविका उज्वला काळे, माजी नगरसेवक प्रदीप बवले, अनिकेत तापकीर, कालिदास तापकीर, सुदर्शन चौधरी, रोहन पवार, गणेश कोकाटे, सारंग तापकीर, नवनाथ थोरवे, माऊली धुले तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्थानिक नगरसेवक दिनेश घुले यांनी आपल्या मनोगतात प्रभागातील नागरिकांना विरंगुळा, व्यायाम आणि मुलांसाठी सुरक्षित खेळण्याची जागा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे उद्यान उभारण्यात येत असल्याचे सांगितले. नागरिकांच्या मागणीनुसार हा विकास प्रकल्प साकारत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## चाकणला डासांचा उपद्रव रोखण्यासाठी धूर फवारणी

चाकण (दै. संध्या)




चाकण नगरपरिषदेच्या माध्यमातून व नगराध्यक्षा मनीषा गोरे यांच्या सहकार्याने वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर डासांचा उपद्रव रोखण्यासाठी येथील प्रभाग क्रमांक दोन मध्ये महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रूपाली कांडगे यांनी नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी आरोग्यदायी पाऊल उचलले आहे. संपूर्ण प्रभागात धूर फवारणी करून नागरिकांच्या जनहिताला प्राधान्य दिले आहे. प्रभाग क्रमांक दोन हा चाकण मार्केट यार्ड जवळ असल्याने येथे भाजीपाल्याचा मोठा बाजार भरतो. त्यामुळे बरेचसे भाजी विक्रेते उर्वरित भाज्या इतरत्र फेकून देत असल्याने डासांचा उपद्रव वाढला होता. वीज केंव्हाही गायब होत असल्याने नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न डेंगू व मलेरिया यासारख्या संभाव्य आजारांमुळे निर्माण झाला होता. याची जाणीव ठेवून प्रभाग क्रमांक दोन मधील स्वप्ननगरी, जय भारत चौक, एकता नगर, मार्केट यार्ड परिसर, समर्थ कॉलनी आदी भागात प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत, असे येथील नगरसेविका रूपाली कांडगे व माजी नगरसेवक राहुल कांडगे यांनी सांगितले. उद्योजक विजय रत्नपारखी, भगवान कांडगे, माणिक पवार, भानुदास पोटवडे, विनायक गोरे व सतीश गोरे आदींनी या उपक्रमाचे कौतुक केले.

## शिवशंभु कॉरीडोर प्रकल्पाला ३९० कोटी रुपयांचा प्रस्ताव : डॉ. अमोल कोल्हे



नारायणगाव (दै. संध्या)

छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज या दोन महान युगपुरुषांच्या स्मृतींना जोडणारा शिवशंभू कॉरिडॉर प्रकल्प छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी किल्ल्यापासून स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान स्थळ असलेल्या वढू बुद्रुक पर्यंत सुमारे 60 किलोमीटर लांबीचा आणि 10 मीटर रुंदीचा हा मार्ग जुन्नरमधील ऐतिहासिक लेणी समूह ओझर व लेण्याद्रीची अष्टविनायक मंदिरे, वाफगावचा होळकरवाडा, पेशवेकालीन टाकसाळ आणि कनेरसरचे यमाई देवस्थान यांसारख्या महत्त्वाच्या स्थळांना जोडणार असून या प्रकल्पाला गती मिळाली आहे. पुणे शिरूर लोकसभा मतदारसंघातील ऐतिहासिक वैभवाचे आर्थिक संधीत रूपांतर करण्यासाठी शिरूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचा शिवशंभू कॉरिडोर या संकल्पनेबाबत 2022 या वर्षापासून पाठपुरावा सुरु होता. या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने 390 कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार केला असून तो राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रकल्पाबाबत खासदार डॉ.अमोल कोल्हे यांनी सांगितले की, शिवशंभू कॉरिडोरमुळे केवळ रस्त्यांचा विकास होणार नाही,तर स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठे बळ मिळणार आहे. पर्यटन वाढल्यामुळे स्थानिक तरुणांना हॉटेल व्यवसाय आणि निवास व्यवस्थेच्या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील.आता या प्रकल्पामुळे जुन्नर व शिरूर तालुक्याच्या पर्यटन क्षेत्राचा चेहरा मोहरा बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# "भवानी पेठेतच माउलींचा मुक्काम"

## प्रशासनाच्या लेखी हमीनंतर पालखी मुक्कामावरील संभ्रम अखेर दूर



आळंदी (दै. संध्या)

गेल्या काही दिवसांपासून वारकरी संप्रदायात चर्चेचा विषय ठरलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पुणे मुक्कामाबाबतचा संभ्रम अखेर दूर झाला असून, यंदाही माउलींची पालखी पुण्यातील भवानी पेठेतील श्री पालखी विठोबा मंदिरातच मुक्कामी राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रशासनाने दिलेल्या लेखी हमीनंतर श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदीने अधिकृत घोषणा केली.

वारकऱ्यांची वाढती संख्या, अपुरी जागा, पार्किंगची अडचण तसेच दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना ऊन-पावसाचा होणारा त्रास यामुळे यंदाचा मुक्काम अन्यत्र हलवण्याची चर्चा रंगली होती. विशेषतः सन २०१० पासून रेसकोर्स मैदानावर मुक्काम हलवण्याची मागणी सातत्याने होत होती. या पार्श्वभूमीवर संस्थान कमिटीने १३ एप्रिल २०२६ रोजीची बैठकही स्थगित केली होती. मात्र अखेर प्रशासनाने ठोस उपाययोजनांची लेखी ग्वाही दिल्यानंतर भवानी पेठेतील मुक्काम कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी पालखी सोहळा प्रमुख अॅड.राजेंद्र उमाप यांना दिलेल्या पत्रात मंदिर परिसरातील गर्दी नियोजनासाठी महत्त्वपूर्ण उपाययोजना करण्यात येत असल्याचे नमूद केले आहे. मंदिरालगतच्या तीन खाजगी मालमत्ता ताब्यात घेण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, मंदिरासमोरील अतिक्रमणे हटवून परिसर मोकळा करण्यात येत आहे. तसेच भाविकांच्या सोयीसाठी नवीन रस्ता निर्मिती, अडथळा ठरणारे विद्युत खांब स्थलांतरित करणे आणि पालखी मार्गावरील अतिक्रमणांवर युद्धपातळीवर कारवाई सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

हा पेच सोडवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ तसेच आमदार हेमंत रासने यांनी विशेष प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे. पुणे महानगरपालिकेकडून या विकासकामांसाठी तब्बल १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, ३१ मे २०२६ पर्यंत आवश्यक जागा ताब्यात घेण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. यंदाचा श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा ८ जुलै रोजी दुपारी ३ वाजता आळंदीतून प्रस्थान ठेवणार असून, ९ आणि १० जुलै रोजी पालखीचा मुक्काम पुण्यातील भवानी पेठेत राहणार आहे. प्रशासनाच्या हमीपत्रानंतर बुधवारी देवस्थानची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे, अॅड. रोहिणी पवार, पालखी सोहळा मालक राजेंद्र आरफळकर, दिंडी समाजाचे अध्यक्ष भाऊ महाराज गोसावी तसेच व्यवस्थापक माऊली वीर उपस्थित होते.



## उन्हाळ्यात जनावरांना होणारी विषबाधा आणि उपाययोजना

**उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने जनावरांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होतो. या काळात जनावरांमध्ये उष्माघात, पाण्याची कमतरता, पचनाचे विकार यांसह विषबाधेच्या घटनाही वाढताना दिसतात. विषबाधा ही गंभीर समस्या असून वेळेवर उपचार न झाल्यास जनावरांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे शेतकरी व पशुपालकांनी या विषयाबाबत जागरूक राहणे अत्यंत आवश्यक आहे.**

जिल्हा माहिती कार्यालय, बुलढाणा

विषबाधा होण्याची प्रमुख कारणे : उन्हाळ्यात चाऱ्याची टंचाई निर्माण झाल्यामुळे जनावरे अनेकदा उपलब्ध असलेली कोणतीही वनस्पती खातात. यामध्ये धोतरा, आकोडा, करट, रानमेथी यांसारख्या विषारी वनस्पतींचा समावेश असू शकतो. अशा वनस्पतींचे सेवन केल्यास जनावरांना विषबाधा होण्याची शक्यता वाढते. याशिवाय शेतात फवारणी केलेल्या चाऱ्यावर राहिलेले कीटकनाशकांचे अंश, रासायनिक खते किंवा औद्योगिक रसायनांचा संपर्क हे देखील विषबाधेचे महत्त्वाचे कारण आहे. काही वेळा कुजलेला किंवा बुरशी लागलेला चारा जनावरांना दिला जातो. अशा चाऱ्यातून तयार होणारे विषारी घटक जनावरांच्या शरीरात जाऊन गंभीर परिणाम करतात. प्लास्टिक, कचरा, तेलकट पदार्थ किंवा रंगयुक्त वस्तू खाल्ल्याने जनावरांच्या पचनसंस्थेवर परिणाम होतो. तसेच औषधांचा अति प्रमाणात किंवा चुकीच्या पद्धतीने वापर केल्यासही विषबाधा होऊ शकते.

विषबाधेची लक्षणे : विषबाधा झाल्यानंतर जनावरांमध्ये काही ठळक लक्षणे दिसून येतात. भूक मंदावणे किंवा पूर्णपणे बंद होणे, तोंडातून फेस येणे, लाळ गळणे, बेचैनी, इकडे-तिकडे धावणे, श्वास घेण्यास त्रास होणे, पोट फुगणे किंवा जुलाब होणे अशी लक्षणे सामान्यतः दिसतात. गंभीर अवस्थेत स्नायूंमध्ये कंप सुटणे, डोळे फिरणे किंवा अचानक मृत्यू होण्याची शक्यता देखील असते. त्यामुळे अशी लक्षणे दिसताच त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे. विषबाधा झाल्याचा संशय आल्यास सर्वप्रथम जनावराला विषारी पदार्थांपासून दूर करावे. तोंडामध्ये उरलेले विषारी पदार्थ काढून टाकावेत आणि स्वच्छ, थंड पाणी पाजावे. कोणतेही घरगुती उपाय किंवा औषधे स्वतःहून देऊ नयेत. तातडीने जवळच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधून योग्य उपचार घ्यावेत. वेळेवर उपचार मिळाल्यास जनावराचा जीव वाचविणे शक्य होते.

प्रतिबंधात्मक उपाय : विषबाधा टाळण्यासाठी शेतकरी व पशुपालकांनी काही गोष्टींची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. जनावरांना देण्यात येणारा चारा व खाद्यपदार्थ स्वच्छ व दर्जेदार असावा. कीटकनाशके आणि रसायने सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. शेतातील विषारी वनस्पती ओळखून त्या नष्ट कराव्यात. जनावरांच्या गोठ्याभोवती स्वच्छता राखणे, नियमित पशुवैद्यकीय तपासणी करणे आणि पुरेसे स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणेही महत्त्वाचे आहे.

उन्हाळ्यात जनावरांची योग्य काळजी घेतल्यास विषबाधेचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो. शेतकऱ्यांनी जागरूक राहून प्रतिबंधात्मक उपाय अमलात आणल्यास जनावरांचे आरोग्य चांगले राहून आर्थिक नुकसान टाळता येऊ शकते. जनावरे ही शेतकऱ्यांची महत्त्वाची संपत्ती असल्याने त्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक पशुपालकाची जबाबदारी आहे.

## भारताची पायाभूत सुविधांमधील तेजी आणि कामगारांचे मूक संकट



**भारत अनेक दशकांत न पाहिलेल्या पायाभूत सुविधांच्या परिवर्तनाच्या टप्प्यातून जात आहे. रस्ते, रेल्वे, विमानतळ, बंदरे, सिंचन प्रकल्प आणि नवीन शहरी केंद्रे वेगाने उभी राहत आहेत. विशेषतः आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये यांचा उदय वेगाने होत आहे. अमरावतीची राजधानी उभारणी, पोलावरम सिंचन योजना, विस्तारणारे राष्ट्रीय महामार्ग, बंदरांचा विकास आणि हैदराबादच्या निवासी तसंच व्यावसायिक इमारतींची उभी वाढ, हे सर्व धाडसी प्रगतीचे संकेत देतात.**

भारताच्या पायाभूत सुविधांसंबंधीच्या महत्त्वाकांक्षा धाडसी आणि अत्यावश्यक आहेत. परंतु पायाभूत सुविधा म्हणजे केवळ काँक्रीट आणि पोलाद नव्हे तर ते मानवी भांडवल आहे. आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये, सध्याची कामगार स्थिती मागणी आणि पुरवठा, आकांक्षा आणि संधी, प्रशिक्षण आणि नोकऱ्या यांच्यातील तीव्र तफावत दर्शवते. जोपर्यंत धोरणकर्ते, उद्योग आणि समाज कामगार धोरणे, कौशल्य विकास आणि मनुष्यबळाच्या सन्मानावर पुनर्विचार करण्यासाठी आताच कृती करत नाहीत, तोपर्यंत भारताच्या विकासाची गाथा त्याच तुटवड्यामुळे धोक्यात येण्याचा धोका आहे, जे भारताला परवडणार नाही. राष्ट्रीय पायाभूत सुविधांइतक्याच तातडीने मानवी भांडवल उभारले पाहिजे.

या दृश्यमान विकासामागे एक संरचनात्मक समस्या आहे, ज्याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. कुशल आणि अर्ध-कुशल कामगारांची वाढती कमतरता ही ती समस्या आहे. विशेषतः स्थानिक समुदायांमधून ही समस्या अधिक दिसून येते.

वाढती कामगार तफावत - महत्वाकांक्षी प्रकल्प असूनही, बांधकामासारख्या शारीरिक श्रमाच्या क्षेत्रांमध्ये स्थानिक कामगारांचा सहभाग लक्षणीयरीत्या कमी आहे. याउलट, आंध्र प्रदेश आणि तेलंगणाच्या विकासाला आधार देणाऱ्या मनुष्यबळात ओडिशा, झारखंड, बिहार, पश्चिम बंगाल, आसाम आणि छत्तीसगड यांसारख्या राज्यांमधून आलेल्या स्थलांतरित कामगारांचं वर्चस्व आहे.

हीच परिस्थिती हैदराबाद आणि विशाखापट्टणममध्येही दिसून येते, जिथे स्थानिक पातळीवर गवंडी, इलेक्ट्रिशियन आणि विशेष कारागीर यांसारख्या प्रशिक्षित कामगारांच्या कमतरतेमुळे कामात सतत विलंब होत असल्याचं आणि खर्च वाढत असल्याचं विकासक आणि कंत्राटदार सांगतात. विशाखापट्टणममध्ये, उद्योग क्षेत्रातील बडे उद्योजक हे मान्य करतात की कुशल कामगारांच्या कमतरतेमुळे बांधकाम क्षेत्रातील तेजीच मंदावत आहे. लोकसंख्याशास्त्र आणि स्थलांतराचे नमुने - आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या दोन्ही राज्यांमध्ये काम करणाऱ्या लोकसंख्या मोठी आहे. येथील 70% पेक्षा जास्त लोकसंख्या 15 ते 59 वयोगटातील आहेत, तर राष्ट्रीय सरासरी सुमारे 66% आहे. सैद्धांतिकदृष्ट्या, यामुळे एक मजबूत मनुष्यबळ उपलब्ध व्हायला हवे. परंतु, वास्तव वेगळेच चित्र दर्शवते. अनेक स्थानिक कामगार, विशेषतः तरुण, बांधकाम आणि शेती यांसारख्या शारीरिक श्रमाच्या कामांमध्ये सहभागी न होण्याचा पर्याय निवडत आहेत. काही जण गिग वर्क, रिटेल यांसारखे पर्यायी रोजगार शोधत आहेत किंवा प्रदेशाबाहेरील शारीरिक श्रमाची नसलेली कामं पसंत करत आहेत.

इतर परदेशात स्थलांतर करतात; परराष्ट्र मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, 2021 ते 2025 दरम्यान केवळ आंध्र प्रदेशातील 76000 हून अधिक कामगारांनी परदेशात, प्रामुख्याने आखाती देशांमध्ये काम करण्यासाठी स्थलांतर परवानगी मिळवली. कामगारांची मागणी वाढत असतानाच, या बाह्य स्थलांतरामुळे उपलब्ध स्थानिक मनुष्यबळ आणखी कमी होते.

बेरोजगारी आणि कौशल्यातील तफावत - पश्चिम आणि दक्षिण भारतातील राज्ये स्थलांतरित मजुरांना आकर्षित करत असली तरी, आंध्र प्रदेश स्वतःच्या बेरोजगारीच्या आव्हानांशीही झुंजत आहे. अधिकृत सर्वेक्षणांनुसार, लाखो रहिवासी शारीरिक श्रमाची कामे नसलेल्या किंवा घरून काम करण्याच्या नोकऱ्यांमध्ये रस दाखवतात. यावरून बांधकाम आणि कृषी यांसारख्या पारंपरिक क्षेत्रांमध्ये नोकरीच्या आकांक्षा आणि उपलब्ध संधी यांच्यात तफावत असल्याचं दिसून येतं.

स्थानिक बेरोजगारीची आकडेवारी देखील सततच्या बेरोजगारीकडे निर्देश करते. बांधकाम प्रकल्पांमध्ये वाढ होत असतानाही, विशाखापट्टणम, कुर्नूल आणि कडप्पा यांसारख्या जिल्ह्यांमध्ये हजारो नोंदणीकृत बेरोजगार व्यक्तींची नोंद झाली आहे. बेरोजगारी, आकांक्षांमधील बदल आणि कौशल्यातील तफावत यांच्या एकत्रित परिणामामुळे, प्रकल्पांची रेलचेल असतानाही स्थानिक कामगार अनेकदा शारीरिक श्रमाची कामे स्वीकारत नाहीत किंवा त्यात टिकून राहत नाहीत.

व्यापक आर्थिक परिणाम - स्थलांतरित मजुरांवरील अवलंबित्व केवळ बांधकामापुरते मर्यादित नाही. आंध्र प्रदेश आणि तेलंगणामधील शेती पेरणी, पुनर्लागवड आणि कापणीसाठी त्यांच्यावर अवलंबून आहे. हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, सुरक्षा सेवा, गोदामे आणि इतर व्यवसायांमध्ये पूर्वेकडील राज्यांमधून मोठ्या संख्येनं स्थलांतरित मजूर काम करतात. हे केवळ स्थानिकांमधील कामगारांच्या कमतरतेचेच प्रतिबिंब नाही, तर राज्यांमधील वाढत्या सामाजिक-आर्थिक परस्परावलंबनावरही प्रकाश टाकते. कंत्राटदार आणि उद्योग संघटनांनी जाहीरपणे इशारा दिला आहे की कामगारांच्या कमतरतेमुळे प्रकल्पांच्या वेळापत्रकात विलंब होत आहे आणि मजुरीचा खर्च वाढत आहे, विशेषतः कुशल कारागिरांसाठी हे मत मांडलं जात आहे.

भारताच्या भविष्यासाठी याचा अर्थ काय - भारतातील कामगारांची कमतरता ही एक अल्पकालीन अडचण नाही तर हा एक संरचनात्मक बदल आहे, ज्याचे परिणाम विकास, समानता आणि प्रादेशिक अर्थव्यवस्थांवर होतात.

प्रकल्पांना विलंब आणि खर्चातील वाढ - कामगारांच्या कमतरतेमुळे प्रकल्पांच्या वेळापत्रकात थेट विलंब होतो आणि मजुरीचा खर्च वाढतो, ज्यामुळे सार्वजनिक आणि खासगी दोन्ही क्षेत्रांतील प्रकल्पांवर परिणाम होतो.

कौशल्याची पोकळी आणि उत्पादकतेतील तफावत - प्रशिक्षित स्थानिक कामगारांची मोठी उपलब्धता नसल्यामुळे, उत्पादकता कमी होते आणि विकासाचा वेग मंदावतो.

स्थलांतराचा दबाव आणि सामाजिक परिणाम - स्थलांतरित मजुरांवरील मोठ्या अवलंबित्वामुळे गृहनिर्माण, कल्याण, सामुदायिक एकीकरण आणि कामगार हक्कांचे प्रश्न निर्माण होतात, तर स्थानिक समुदायांना रोजगाराच्या संधी मिळत नाहीत.

पुढील वाटचाल - हे असंतुलन दूर करण्यासाठी, भारताने कामगार नियोजनाला विकास धोरणात समाकलित करणारे सर्वांगीण उपाय अवलंबले पाहिजेत ते खालीलप्रमाणे...

प्रशिक्षण कार्यक्रम उद्योगांच्या गरजांशी जुळणारे असावेत आणि महामार्ग तसंच स्मार्ट शहरांपासून ते सिंचन आणि गृहनिर्माणापर्यंतच्या प्रत्यक्ष प्रकल्पांशी जवळून जोडलेले असावेत.

बांधकाम, शेती आणि संबंधित व्यवसायांना आकर्षक बनवण्यासाठी सुधारित वेतन, सुरक्षा मानके, सन्मान आणि स्पष्ट करिअर मार्गांची आवश्यकता आहे.

तंत्रज्ञान आणि यांत्रिकीकरण :

आधुनिक बांधकाम पद्धती, प्रीकास्ट तंत्रज्ञान आणि यांत्रिकीकरणामध्ये गुंतवणूक केल्यानं मानवी श्रमावरील अतिरिक्त अवलंबित्व कमी होऊन उत्पादकता वाढू शकते.

स्थलांतरित मजुरांना औपचारिक स्वरूप देणे :

योग्य सामाजिक सुरक्षा, कामगार नोंदणी प्रणाली आणि कल्याणकारी तरतुदींमुळे मनुष्यबळ स्थिर होऊ शकते आणि कंत्राटदारांना कुशल कामगार टिकवून ठेवण्यास मदत होऊ शकते.

• • •

## सॅमसंगनं भारतात लॉन्च केला नवीन विजन एआय मिनी एलईडी टीव्ही लाइनअप

मुंबई (दै. संध्या)





सॅमसंगनं भारतात आपला नवीन विजन एआय-पावर्ड मिनी एलईडी टीव्ही सीरीज लॉन्च केला आहे. ही नवीन रेंज एआय-आधारित चित्र आणि ध्वनी वैशिष्ट्ये, प्रगत मिनी एलईडी डिस्प्ले तंत्रज्ञान आणि गेमिंगसाठी खास मोशन एक्ससेलरेटर 144 हर्ट्झ सपोर्टसह येते. ग्राहकांना उत्तम कॉन्ट्रास्ट, कलर ॲक्युरसी, मोशन हँडलिंग आणि स्मार्ट कनेक्टेड होम अनुभव देण्यासाठी ही टीव्ही तयार करण्यात आली आहेत.

किंमत आणि उपलब्धता : या नवीन सॅमसंग मिनी एलईडी टीव्हीची सुरुवातीची किंमत 42,990 रुपये आहे. लॉन्च ऑफरमध्ये 5 टक्के कॅशबॅक, झिरो डाउन पेमेंट आणि 30 महिन्यांपर्यंतच्या ईएमआय पर्यायांचा समावेश आहे. हे टीव्ही आता प्रमुख रिटेल स्टोर्स, फ्लिपकार्ट आणि samsung.com वर उपलब्ध झाले आहेत.

वैशिष्ट्ये आणि स्पेसिफिकेशन्स : या सीरीजमध्ये 43 इंच ते 100 इंच पर्यंत विविध स्क्रीन साइझ उपलब्ध आहेत. मिनी एलईडी तंत्रज्ञानामुळं लहान एलईडी वापरून अचूक बॅकलाइट कंट्रोल मिळतं, ज्यामुळं चित्र अधिक स्पष्ट, ब्राइट आणि डीप कॉन्ट्रास्टसह दिसतं. प्युअर स्पेक्ट्रम कलर तंत्रज्ञान आणि फॉस्फर टेक्नॉलॉजीमुळं 90 टक्क्यांहून अधिक वाइड कलर गॅमट मिळतं. कलर बूस्टर आणि मिनी एलईडी एचडीआर वैशिष्ट्ये रंग आणि कॉन्ट्रास्ट आणखी सुधारतात. गेमिंग आणि स्पोर्ट्ससाठी मोशन एक्ससेलरेटर 144 हर्ट्झ तंत्रज्ञान आहे, जे फास्ट मूव्हमेंटमध्ये मोशन ब्लर कमी करतं आणि फ्रेम्समध्ये गुळगुळीतता वाढवते. टीव्हीमध्ये NQ4 AI Gen2 प्रोसेसर आहे, ज्यात 20 न्यूरॉन न्यूरल नेटवर्क आर्किटेक्चर आहे. हे रिअल-टाइममध्ये चित्र आणि आवाज ऑप्टिमाइझ करतं, एआय अपस्केलिंग, क्लॅरिटी आणि कॉन्ट्रास्ट सुधारतं. One UI Tizen ऑपरेटिंग सिस्टमसह सात वर्षांपर्यंत OS अपग्रेड्स मिळतील. सॅमसंग टीव्ही प्लसवर 150 हून अधिक FAST चॅनेल्स उपलब्ध आहेत. AI साउंड कंट्रोलर, सॅमसंग नॉक्स सिक्युरिटी, स्मार्टथिंग्ज इंटिग्रेशन आणि मेटलस्ट्रीम डिझाइन ही प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

## भू-राजकीय तणावामुळे रुपयाची झालेली घसरण; कारणे, चिंता आणि पुढील दिशा

**1 मे 2025 ते 8 मे 2026 या कालावधीत, अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया 83.85 वरून 95.40 पर्यंत घसरला. गेल्या 12 महिन्यांत झालेली ही जवळपास 13.77% ची घसरण भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत तीव्र मानली जाते; ज्यामुळे गुंतवणूकदार, व्यावसायिक वर्तुळ, नियामक संस्था आणि सरकार यांच्यामध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे.**



गेल्या वर्षभरात भारतीय अर्थव्यवस्थेच्या 'स्थूल आर्थिक मूलभूत घटकांना' कोणताही मोठा किंवा अचानक धक्का बसलेला नाही, ज्यामुळे भारतीय रुपयावर प्रतिकूल परिणाम झाला असता. असं असूनही, विशेषतः मार्च आणि एप्रिल 2026 या महिन्यांत, रुपयाची कामगिरी आशियातील सर्वात निराशाजनक (सर्वात खराब) चलन म्हणून नोंदवली गेली आहे. सध्याच्या या परिस्थितीसाठी कारणीभूत असलेल्या अनेक आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत घटकांना याचं श्रेय दिलं जाऊ शकतं.

केवळ जुलै 2025 या एकाच महिन्यात, अमेरिकेमुळे पुन्हा निर्माण झालेल्या व्यापार-विषयक अनिश्चितता आणि शुल्कासंबंधीच्या (tariff) चिंतांमुळे रुपयाचे मूल्य 2.7% ने घसरले. जुलै 2025 मधील रुपयाची ही घसरण प्रामुख्याने गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास कमकुवत झाल्यामुळे झाली; ज्यामुळे भारतीय भांडवली बाजारांतून परकीय भांडवली पैशाची देशाबाहेर जावक म्हणजेच बहिर्प्रवाह (outflow) सुरू झाला. भांडवलाच्या या अचानक बहिर्प्रवाहामुळे डॉलरची मागणी वाढली, कारण परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांनी आपल्याकडील रुपयांचे अमेरिकन डॉलरमध्ये रूपांतर केले; ज्यामुळे रुपयाचे मूल्य आणखी खाली घसरले.

सर्वसाधारणपणे, भारताचे देशांतर्गत व्याजदर नेहमीच अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह दरापेक्षा जास्त होते, ज्यामुळे सैद्धांतिकदृष्ट्या परकीय भांडवलासाठी रुपयाचे आकर्षण टिकून राहिले. सध्याच्या व्याजदरांनुसार, हा फरक 75 बेसिस पॉइंट्सचा आहे; म्हणजेच, भारतातील व्याजदर अमेरिकेतील दरांपेक्षा 0.75% जास्त आहेत. व्याजदरांमध्ये अनुकूल फरक असूनही, अपेक्षेप्रमाणे रुपया मजबूत झाला नाही, कारण 2026 मध्ये कच्च्या तेलाच्या किमती, व्यापारातील घडामोडी आणि भू-राजकीय धोके यांनी रुपयाच्या हालचालींवर वर्चस्व गाजवले आहे.

इराण आणि अमेरिका यांच्यातील सुरू असलेल्या संघर्षामुळे फेब्रुवारीच्या अखेरीपासून ते एप्रिल 2026 च्या अखेरीपर्यंत 60 दिवसांत रुपया 5.35% ने घसरला. परिणामी, भारतीय रिझर्व्ह बँकेचे प्रभावी निरीक्षण आणि गरजेनुसार वेळेवर हस्तक्षेप करूनही रुपया अचानक कमकुवत होण्याचा धोका दर्शवत, रुपयाने अभूतपूर्व अस्थिरता अनुभवली.

अमेरिका आणि इस्रायलकडून इराणवर होणाऱ्या सततच्या हल्ल्यांमुळे मध्य-पूर्वेतील वाढत्या तणावामुळे कच्च्या तेलावरील भू-राजकीय जोखमीचे प्रीमियम वाढले आहेत. सामान्यतः, ऊर्जा बाजारपेठा होर्मुझच्या सामुद्रधुनीभोवती वाढलेल्या तणावामुळे पुरवठा साखळीत होणाऱ्या संभाव्य व्यत्ययांचा विचार करतात. ही सामुद्रधुनी एक महत्त्वाचा आणि अटळ अडथळा आहे, ज्यातून जगातील जवळपास 15-20% कच्चे तेल वाहते. त्यामुळे, मालवाहतुकीला कोणताही धोका निर्माण झाल्यास किंवा या सामुद्रधुनीवर नाकेबंदी झाल्यास, पुरवठा कमी होण्याचा धोका व्यापाऱ्यांना जाणवतो आणि त्यामुळे किमती वाढतात.

मे ते डिसेंबर 2025 या कालावधीत कच्च्या तेलाचे दर स्थिर राहिले आणि ते प्रति बॅरल 58.35 डॉलर ते 60 डॉलरच्या दरम्यान होते. फेब्रुवारी 2026 च्या अखेरीस इराण आणि अमेरिका यांच्यात संघर्ष सुरू झाल्यामुळे, एप्रिल 2026 मध्ये कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल 108 डॉलरपर्यंत पोहोचले. ही 85% ची वाढ होती आणि त्यानंतर हे दर प्रति बॅरल 85 डॉलर ते 100 डॉलरच्या दरम्यानच राहिले आहेत.

कच्च्या तेलाच्या दरांमधील अशा प्रचंड वाढीसाठी आणि त्यातून निर्माण झालेल्या तुटवड्यासाठी भारत सज्ज नव्हता. आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये भारताच्या कच्च्या तेलाच्या आयातीचे मूल्य अंदाजे 180 ते 185 अब्ज डॉलर इतके होते. मात्र, एप्रिल ते डिसेंबर 2025 या कालावधीतील कच्च्या तेलाची आयात केवळ 90.7 अब्ज डॉलर इतकीच झाली होती; हा 2024 मधील याच कालावधीच्या तुलनेत 12% ची निव्वळ घट दर्शवतो. कच्च्या तेलाची आयात 90.7 अब्ज डॉलरवरून 185 अब्ज डॉलरपर्यंत वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे जानेवारी ते एप्रिल 2026 या काळात कच्च्या तेलाच्या दरांमध्ये झालेली वाढ हे होय. अशा प्रकारे, कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल 100 डॉलरच्यावर गेल्यामुळे, दरमहा होणाऱ्या डॉलरच्या बहिर्प्रवाहात (outflow) अंदाजे 8 ते 8 अब्ज डॉलरची निव्वळ वाढ झाली. परिणामी, डॉलरच्या या वाढीव बहिर्प्रवाहामुळे रुपयाच्या मूल्यात अभूतपूर्व घसरण झाली. त्याचप्रमाणे, कच्च्या तेलाच्या वापरात होणाऱ्या कोणत्याही वाढीमुळे भारताचे आयात बिल लक्षणीयरीत्या वाढते; कारण भारत या बाबतीत स्वयंपूर्ण नाही आणि तो आयातीवर, विशेषतः मध्यपूर्वेकडील देशांतून होणाऱ्या तेलाच्या आयातीवर प्रचंड प्रमाणात अवलंबून आहे.

## बंगालला नवी ऊर्जा : 'वीज' कशा प्रकारे राज्याच्या आर्थिक पुनरुज्जीवनाचा मार्ग प्रशस्त करेल

पश्चिम बंगालमध्ये नवीन सरकार स्थापन झाल्यामुळे, त्यासमोर उभे राहणारे सर्वात महत्त्वपूर्ण आव्हानांपैकी एक म्हणजे राज्याच्या आर्थिक गतीला पुन्हा चालना देणे. अलीकडील निवडणुका केवळ राजकीय बदलाचेच प्रतिबिंब नाहीत, तर त्या रोजगार, औद्योगिक वाढ आणि विकासाचे सुधारित परिणाम यांबाबतच्या जनतेच्या मागणीलाही अधोरेखित करतात. एकेकाळी भारताच्या औद्योगिक अर्थव्यवस्थेचे केंद्रबिंदू असलेल्या या राज्यासाठी, हा क्षण आर्थिक पुनरुज्जीवनाची एक सुवर्णसंधी घेऊन आला आहे.



तरीही, पश्चिम बंगालच्या विकासाचा आलेख गेल्या अनेक दशकांपासून त्याच्या अंगभूत क्षमतेच्या तुलनेत मागेच राहिला आहे. राज्याचे मोक्याचे स्थान, प्रमुख बंदरे, मालवाहतूक मार्गिका आणि पूर्व व ईशान्येकडील बाजारपेठांपर्यंतची सुलभ पोहोच असूनही गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक किंवा तामिळनाडू यांसारख्या राज्यांच्या विपरीत पश्चिम बंगालला उत्पादन आणि गुंतवणुकीचे एक प्रमुख केंद्र म्हणून उदयास येण्यासाठी संघर्ष करावा लागला आहे. 2011-12 ते 2023-24 या कालावधीत, पश्चिम बंगालची आर्थिक वाढ अनेक प्रमुख औद्योगिक राज्यांच्या तुलनेत सातत्याने मागे राहिली; तर राज्याच्या अर्थव्यवस्थेतील उत्पादन क्षेत्राचा वाटा मात्र बऱ्याच अंशी स्थिर राहिला. यामागील एक प्रमुख कारण ऊर्जा क्षेत्रात दडलेले आहे.

विश्वसनीय आणि परवडणाऱ्या विजेविना कोणतीही मोठी औद्योगिक अर्थव्यवस्था भरभराटीस येऊ शकत नाही. पश्चिम बंगालने जवळपास प्रत्येक घरापर्यंत वीज पोहोचवण्यात आणि विजेची एकूण उपलब्धता सुधारण्यात यश मिळवले असले, तरीही विजेची विश्वसनीयता, उद्योगांसाठीचे दर, जुने होत चाललेले औष्णिक वीज प्रकल्प आणि वीज वहनातील अडथळे यांविषयीच्या चिंता राज्याच्या स्पर्धाक्षमतेवर परिणाम करतच आहेत. राज्याची अनेक औद्योगिक आणि लॉजिस्टिक्स केंद्रे आजही कोळशावर आधारित वीज प्रणालींवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहेत; आणि या प्रणालींना इंधनाचा तुटवडा तसंच वाढत्या परिचालन खर्चाच्या समस्यांना सामोरे जावे लागते. आर्थिक वाढीचं स्वरूपच ज्या वेगाने बदलत आहे, त्यामुळे हे आव्हान भविष्यात आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. उत्पादन, लॉजिस्टिक्स, शहरी पायाभूत सुविधा, शीतसाखळी, मेट्रो प्रणाली आणि डेटा सेंटर्स ही क्षेत्रे वेगाने 'अत्यंत अधिक विजेची गरज असलेली' क्षेत्रे बनत आहेत. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या (CEA) अंदाजानुसार, जसजसा औद्योगिकीकरणाचा वेग वाढेल, तसतशी पुढील दशकात पूर्व भारतात विजेच्या मागणीत प्रचंड वाढ होण्याची अपेक्षा आहे. केवळ पश्चिम बंगालचाच विचार करता, 2025 मध्ये विजेची कमाल मागणी 12500 मेगावॅटपेक्षाही अधिक नोंदवली गेली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अखिल भारतीय मराठा महासंघ पुणे शहरातर्फे छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

पुणे (दैनिक संध्या) : स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त अखिल भारतीय मराठा महासंघ, पुणे शहराने डेक्कन येथील स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. स्वराज्याच्या रक्षणासाठी अदम्य धैर्य, अपराजित रणनिती आणि तेजस्वी बुद्धिमत्तेचा परिपूर्ण उदाहरण ठरलेले छत्रपती संभाजी महाराज, प्रतिकूल परिस्थितीतही स्वराज्यनिष्ठा अबाधित ठेवत, औरंगजेबाच्या आक्रमणासमोर न झुकता स्वाभिमान, धर्मनिष्ठा आणि पराक्रमाची परंपरा जपत होते. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या तेजस्वी बुद्धिमत्ता आणि रणनितीच्या गौरवाला सलाम केला. कार्यक्रमात शहराचे अध्यक्ष युवराज दिसले, सरचिटणीस गणेश मापारी, महिला कार्याध्यक्ष मिलन पवार, उपाध्यक्ष कमिनी मेमाणे, तसेच तानाजी शिरोळे, प्रांजल काळे, जितेंद्र कोंढरे, रागिनी अमराळे, अश्विनी शिंदे, रविंद्र मेमाणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### उषादेवी जगदाळे यांना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून श्रद्धांजली

■ लोकाभिमुख आणि स्नेहशील नेतृत्व हरपले : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

पुणे (दैनिक संध्या) : दौंड तालुक्याच्या माजी आमदार उषादेवी कृष्णराव जगदाळे यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आणि वेदनादायी असून, त्यांच्या जाण्याने पुणे जिल्ह्याच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रातील एक स्नेहशील, लोकाभिमुख नेतृत्व हरपल्याची शोकभावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात, "माँ" म्हणून सर्वपरिचित असलेल्या उषादेवी जगदाळे यांनी दोन वेळा आमदार म्हणून दौंड तालुक्याचे प्रतिनिधित्व करत जनतेची निष्ठेने सेवा केली. त्यांचे पती कृष्णराव उर्फ बाळासाहेब जगदाळे यांनीही आमदार म्हणून तालुक्याच्या विकासात मोठे योगदान दिले. जगदाळे कुटुंबाचा वारसा त्यांचे सुपुत्र पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे समर्थपणे चालवत आहेत. जगदाळे पाटील कुटुंब हे सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणारे घराणे म्हणून ओळखले जाते. जनतेशी असलेली त्यांची आत्मीयता, साधेपणा आणि समाजासाठीची बांधिलकी कायम स्मरणात राहील. पवार कुटुंब आणि जगदाळे कुटुंब यांचे अनेक दशकांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. उषादेवींच्या जाण्याने केवळ जगदाळे कुटुंबाचीच नव्हे, तर संपूर्ण पुणे जिल्ह्याच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. ही पवार कुटुंबासाठीदेखील वैयक्तिक हानी आहे. या प्रसंगी जगदाळे कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, ही प्रार्थना करते, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी शोकसंदेशात म्हटले आहे.



### बारामतीत युगेंद्र पवार दुष्काळी भागांच्या दौऱ्यावर

■ विविध समस्यांसंदर्भात तहसीलदार स्वप्नील रावडे यांची घेतली भेट

बारामती (दैनिक संध्या) : बारामती तालुक्यातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या व अडचणींसंदर्भात तहसीलदार स्वप्नील रावडे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.तसेच तीव्र उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर सध्या गावोगावी दौरे करून स्थानिक नागरिकांशी संवाद साधून पिण्याचे पाणी,जनावरांसाठी पाणी तसेच सिंचनाच्या पाण्यासह विविध समस्या व अडचणींचा आढावा घेत आहे.या भेटीदरम्यान तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित केलेले प्रश्न, प्रलंबित समस्या व अडचणी प्रशासकीय प्रमुख म्हणून आपल्या निर्दशनास आणून देण्यासाठी आलो आहे,असेही नमूद केले. विशेषतः सध्या वाढत असलेल्या तीव्र उन्हाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या सिंचनाच्या समस्या,पाणीटंचाई, वीजपुरवठ्यातील अडथळे तसेच शेतीपिकांच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात,अशीही मागणी यावेळी केली. तसेच अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होत असून,टँकरद्वारे पाणीपुरवठा वाढविणे,विहिरी व जलस्रोतांची स्वच्छता तसेच जलसंधारण कामांना गती देण्याची आवश्यकता असल्याचेही युगेंद्र पवार यांनी तहसीलदारांना सांगितले.



### बाजारात पावडरने पिकविलेले आंबे खाल तर आरोग्य बिघडणार

काऱ्हाटी (दैनिक संध्या) : सध्या बाजारपेठेत फळांचा राजा मार्चमध्ये दाखल झाला आहे. फळात पिकण्याची योग्य ती नैसर्गिक प्रक्रिया होण्याआधीच कार्बाईडने पिकवून बाजारात आणलेले आंबे मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यावर ग्राहक भर देत आहेत. त्यामुळे नैसर्गिक पद्धतीने पिकविलेले आंबे खरेदी करूनच त्याचा आमरस खा, अन्यथा मोठ्या प्रमाणात आमरस खाणे आरोग्यास हानिकारक आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. यंदा मार्चमध्ये केसर, बदाम, दसेरी, पेवनदी, तोतापुरी, बैगनपल्लीसह अन्य आंबे बाजारात दाखल झाले आहेत. परंतु, नैसर्गिक पद्धतीने पिकविलेले आंबे बाजारात कमी प्रमाणात आहेत. त्यामुळे गावरान आंबे सध्यातरी महाग मिळत आहे. हे कलमी आंबे कार्बाइडने पिकवून बाजारात आणलेली असतात. त्यामुळे हे आंबे खाल्ल्यानंतर त्याचे आरोग्यावर अनेकवेळा वाईट परिणाम होत असतात. म्हणूनच ग्रामीण भागामध्ये नैसर्गिक पद्धतीने पिकविलेले आंबे खाण्यावर भर दिला जातो. दिवसेंदिवस गावरान आंब्यांचे प्रमाण कमी होत आहे. आजकाल प्रत्येकाला झटपट फळं लागणारी झाडे हवी आहेत. त्यामुळे कलमी आंब्यांचे प्रमाण वाढले आहे. यात गावरान आंबे उशिरा येतात. त्यामुळे कार्बाईडने पिकविलेले आंबे बाजारात दाखल झालेले असतात. शहरी भागातील नागरिक सुरुवातीला त्यावरच ताव मारतात. नैसर्गिक पिकविलेले आंबे खाण्यावर भर देत असतात. आता कार्बाईइडने पिकविलेले आंबे दाखल झाले आहेत. त्यावर अद्याप अन्न व औषधी प्रशासनाकडून कारवाई करण्यात आलेली नाही.

# पुरंदर तालुक्यातील स्थानिक नागरिकांना टोल माफ करावा

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केली आळंदी ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाची पाहणी

**भाजपची मागणी**

जेजुरी (दै. संध्या)

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून आळंदी ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाची पाहणी करण्यात आली. यावेळी जेजुरी येथे भाजपाच्या वतीने स्थानिकांना या राष्ट्रीय महामार्गावर टोल माफ करावा अशी मागणी भाजपाच्या वतीने करण्यात आली.

गुरुवार दिनांक 14 रोजी देशाचे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी खासगी बसमधून हडपसर ते पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गाची पाहणी केली.

सासवड जेजुरी राष्ट्रीय महामार्गावरील बेलसर फाटा जवळील टोल नाक्याची त्यांनी पाहणी केली. यावेळी स्थानिक शेतकरी व नागरिकांनी पुरंदर तालुक्यातील स्थानिक नागरिकांना टोल रद्द करावा अशी निवेदन देवून मागणी केली. जेजुरी येथे श्री मार्तंड देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त ॲड. विश्वास पानसे, विश्वस्त मंगेश घोणे,पोपट खोमणे व तहसीलदार विक्रम राजपूत यांची खंडोबा देवाची पगडी, देवाचा फोटो देवून तर जेजुरी शहर भाजपाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची मूर्ती देवून नितीन गडकरी यांचा सन्मान केला.





यावेळी माजी आमदार अशोक टेकवडे,भाजपचे जेजुरी शहर अध्यक्ष सचिन पेशवे,पदाधिकारी अलका शिंदे,हेमंत सोनवणे,सचिन लंबाते,सदानंद बारभाई,शिवाजी बारसुडे,जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले आदी उपस्थित होते.

आळंदी ते पंढरपूर या मार्गावरून संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा जात असतो. वारकरी बांधवांसाठी आळंदी ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग विकसित करण्यात आला आहे. या राष्ट्रीय महामार्गावर बेलसर फाटा जवळील टोल नाक्यावर पुरंदर तालुक्यातील स्थानिक नागरिकांना टोल रद्द करावा अशी मागणी भाजपाच्या वतीने करण्यात आली.

यावेळी बारामती विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार,भोर विभागाचे पोलिस उपअधीक्षक राजेंद्रसिंह गौर उपस्थित होते. आज सकाळी जेजुरी येथून ते पंढरपूर कडे रवाना झाले. फलटण येथे झालेल्या पत्रकार परिषदेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जेजुरी शहरातून जाणाऱ्या उड्डाण पुलासाठी 250 कोटी रुपये मंजूर करण्यात आले असल्याचे सांगितले. अशी माहिती जेजुरी शहर भाजपाचे अध्यक्ष सचिन पेशवे यांनी सांगितले.

## अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्याचा तडाखा

नीरा (दै. संध्या)

नीरा शहरासह परिसराला बुधवारी सायंकाळी अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याचा जोरदार तडाखा बसला. सायंकाळी सुमारे ६.४५ वाजण्याच्या सुमारास अचानक वातावरणात बदल होऊन सोसाट्याच्या वाऱ्यासह दमदार पावसाने हजेरी लावली. या वादळामुळे नीरा नदीकाठी आयोजित करण्यात आलेल्या कीर्तन महोत्सवाच्या मंडपाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून मंडप फाटल्याची घटना घडली. मात्र, सर्व नुकसान भरून काढत शुक्रवारी नियोजित वेळेतच महोत्सव सुरू होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या उकाड्याने नागरिक त्रस्त झाले होते. अशातच झालेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आणि नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला. मात्र, अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे काही काळ जनजीवन विस्कळीत झाले. नीरा बाजारपेठेत धुळीचे मोठे लोट उठल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. आठवडे बाजार असल्याने बाजारपेठेत मोठी गर्दी होती. जोरदार वाऱ्यामुळे व्यापारी व ग्राहकांची एकच धावपळ उडाली. काही ठिकाणी उभारलेले तात्पुरते तंबू उडून गेले, तर अनेक दुचाकी वाहने कोसळल्याच्या घटना घडल्या. नीरा, राख, कणेलवाडी, गुळुंचे , पिंपरे खुर्द, जेजुरी आणि मांडकी परिसरात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस झाला. काही भागांत वाऱ्याचा वेग इतका जास्त होता की झाडांच्या फांद्या तुटून रस्त्यावर पडल्याचेही चित्र दिसून आले.

## बायोॲग्री नेक्स्ट ग्लोबल कॉन्फरन्स अँड एक्स्पोचे उद्घाटन

पुणे (दै. संध्या)

हयात रीजेंसी, विमाननगर, पुणे येथे आज २ऱ्या 'बायोॲग्री नेक्स्ट ग्लोबल कॉन्फरन्स अँड एक्स्पो २०२६' ला उत्साहात प्रारंभ झाला. कृषी जैविक (Agricultural Biologicals) क्षेत्रातील धोरणकर्ते, शास्त्रज्ञ, उद्योग क्षेत्रातील नेते, नवोन्मेषक, कृषी-इनपुट कंपन्या, स्टार्टअप्स आणि जागतिक स्तरावरील विविध भागधारकांना एका व्यासपीठावर आणणाऱ्या या परिषद व प्रदर्शनाचे आयोजन स्नेल इंटिग्रल प्रा. लि. यांच्या वतीने करण्यात आले आहे.

"कृषी जैविक उत्पादनांच्या निर्मितीसाठी भारत जागतिक उत्पादन केंद्र" ही या प्रतिष्ठित दोन दिवसीय परिषद व प्रदर्शनाची मुख्य संकल्पना आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र शासनाचे कृषिमंत्री तथा प्रमुख





पाहुणे मा. दत्तात्रय भरणे यांच्या विशेष व्हिडिओ संदेशाद्वारे झाले. त्यांनी परिषदेला अधिकृतपणे उद्घाटन करताना शाश्वत शेती, मातीचे आरोग्य सुधारणा आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांच्या माध्यमातून भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी कृषी जैविक उत्पादनांचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. उद्घाटन प्रसंगी बोलताना श्री. दत्तात्रय भरणे म्हणाले, "शाश्वत शेती आणि अन्नसुरक्षेसाठी कृषी जैविक उत्पादने हा एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनत आहे. नवोन्मेष, संशोधन आणि उद्योग क्षेत्रातील सहकार्याच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि भारत या क्षेत्रात जागतिक नेतृत्व करू शकतात." उद्घाटन सत्रात स्नेल इंटिग्रल प्रा. लि. चे संस्थापक व व्यवस्थापकीय भागीदार श्री. अमित बीके खरे, कान बायोसिसच्या सीएमडी तथा बायोॲग्री नेक्स्ट आयोजन समितीच्या सह-अध्यक्षा सौ. संदीपा कानिटकर, क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शनचे मुख्य शाश्वतता अधिकारी व ग्रीनॲग प्रमुख श्री. सर्जीवन मनहास, आयसीएआर-आयआयएचआरचे माजी प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. एम. एस. राव, महाराष्ट्र कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी श्री. सुनील बोरकर आणि नोव्होनेसिसचे दक्षिण आशिया, मध्य पूर्व व आफ्रिका विभागाचे कृषी प्रमुख श्री. शन्मुगम संबंथन यांचा मान्यवर पॅनेलमध्ये समावेश होता.

या मान्यवरांनी कृषी जैविक क्षेत्रातील भारतासमोरील नव्या संधी तसेच भारताला जागतिक उत्पादन व नवोन्मेष केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी शासन, उद्योग, संशोधन संस्था आणि शेतकरी यांच्यात अधिक मजबूत सहकार्याची गरज यावर चर्चा केली. या परिषदेला देश-विदेशातील कंपन्या, तंत्रज्ञान पुरवठादार, संशोधक, धोरणकर्ते आणि कृषी व्यवसाय क्षेत्रातील तज्ज्ञांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात शंभूजयंती उत्साहात

### शिव-शंभू गर्जना, प्रतिमा पूजन, 'छावा' चित्रपटाच्या प्रदर्शनाने शंभूराजांना अभिवादन

**छत्रपती संभाजी महाराजांमुळे महाराष्ट्रधर्म टिकला - डॉ. कराड**

पुणे (दै. संध्या)

ढोल-ताशांचा निनाद, भगवी पताका, पहाडी आवाजातील गगनभेदी शिव-शंभू गर्जना, 'छत्रपती शिवाजी महाराज की जय!', 'जय भवानी, जय शिवराय, जय शंभूराजे!' आणि 'नमो पार्वती पते, हर हर महादेव' या घोषणांच्या जयघोषात एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठात (एडीटी) महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती संभाजी महाराज यांची ३६९वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

एमआयटी एडीटी विद्यापीठातील उर्मिलाताई कराड



सभागृहात प्रतिमापूजन, शिव-शंभू गर्जना व विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या व्याख्यानाद्वारे स्वराज्याचे धाकटे छत्रपती संभाजी महाराज यांचे कार्य विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आले. याप्रसंगी प्र. कुलगुरू प्रा. डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. मोहित दुबे, डॉ. नचिकेत ठाकूर, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. सुराज भोयार आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी शिवराय ढोल-ताशा पथकातील सदस्यांचा त्यांच्या पथकातील योगदानाबद्दल सन्मान करण्यात आला. व्याख्यानानंतर सभागृहात 'छावा' या चित्रपटाचे विशेष प्रदर्शन करण्यात आले. चित्रपटातील छत्रपती संभाजी महाराजांच्या आयुष्यावरील प्रसंग मोठ्या पडद्यावर अनुभवताना सभागृहातील विद्यार्थ्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. तर चित्रपटाचा शेवट पाहताना सभागृहातील वातावरण अतिशय भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.

याप्रसंगी व्याख्यानात प्रा. डॉ. कराड म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराज हे ऊर्जेचा प्रचंड मोठा स्रोत आहेत. शिवरायांनंतर स्वराज्यावर चालून आलेली संकटांची मालिका छत्रपती संभाजी महाराजांनी लीलया पेलली. छत्रपती झाल्यानंतर त्यांनी पुढील नऊ वर्षे अविरत, न थकता असंख्य लढाया लढल्या आणि सर्वच जिंकल्या. त्यांच्या चिवट प्रतिकारामुळेच औरंगजेबाचे लाखोंचे बलाढ्य सैन्यही हतबल झाले. त्यामुळे संभाजी राजांचे इतिहासातील योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांच्यामुळेच खरंतर महाराष्ट्रधर्म टिकला, वाढला," असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

## पुण्यात जिल्हा नियोजन समितीची बैठक ऑनलाइन

पुणे (दै. संध्या)

प्रशासकीय खर्चात कपात आणि काटकसरीच्या पार्श्वभूमीवर पुण्यात शुक्रवारी (ता. १५) होणारी जिल्हा नियोजन समितीची बैठक ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. राज्य सरकारच्या नव्या निर्देशांची तातडीने अंमलबजावणी करण्यास जिल्हा प्रशासनाने सुरुवात केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रशासकीय कामकाजाच्या खर्चात कपात करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार बुधवारी मुख्य सचिवांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना बैठका ऑनलाइन पद्धतीने घेण्याच्या सूचना दिल्या. त्याची अंमलबजावणी पुण्यात सुरू झाली आहे. बैठकीसाठी जिल्हा परिषद, महापालिका तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आपापल्या कार्यालयातूनच व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठकीत सहभागी होणार आहेत. त्यामुळे अधिकाऱ्यांचा प्रवासाचा वेळ, इंधन खर्च आणि इतर प्रशासकीय खर्चात बचत होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या विधानभवनमध्ये बैठकीसाठी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यासमवेत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर आणि काही निवडक कर्मचारी विधान भवनात उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर होणारी खरीप हंगाम आढावा बैठकही ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय कृषी विभागाने घेतला आहे.

# बांधकाम उद्योग क्षेत्रातील नेत्यांनी दिला नावीन्य आणि शाश्वततेवर भर

पुणे (दै. संध्या)

मुंबईत ३ ते ५ जून २०२६ दरम्यान होणाऱ्या 'वर्ल्ड ऑफ कॉंक्रिट इंडिया'च्या १२ व्या आवृत्तीच्या पार्श्वभूमीवर, इन्फॉर्मा मार्केट्सतर्फे पुण्यात एका विशेष गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत पुणे आणि पश्चिम भारतातील वेगाने वाढणाऱ्या पायाभूत सुविधा, नवीन बांधकाम साहित्य आणि शाश्वत बांधकाम पद्धतींच्या गरजेवर सखोल चर्चा झाली. या गोलमेज परिषदेच्या चर्चेत बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया (BAI), पुणे चे राज्य सचिव श्री. मनोज देशमुख; आर्किटेक्ट्स इंजिनियर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशनचे (AESA) अध्यक्ष महेश बांगड; इंडस्ट्रियल फ्लोअरिंग असोसिएशनचे (IFA) अध्यक्ष आणि ॲव्हकॉन टेक्निक्सचे व्यवस्थापकीय संचालक अजय सिंगम; १लॅटिस, आईजीएस चे वरिष्ठ संचालक श्री.





सुयोग केळुस्कर; सिका इंडियाचे संचालक (टार्गेट मार्केट अँड प्रॉडक्ट मॅनेजमेंट) श्री. जसवंत शोभना; बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजीचे महाव्यवस्थापक (अभियांत्रिकी विभाग) श्री. आप्पासाहेब भोसले आणि इन्फॉर्मा मार्केट्स इन इंडियाचे वरिष्ठ गट संचालक श्री. रजनीश खट्टर यांचा समावेश होता. या नेत्यांनी बाजारपेठेतील संधी, शाश्वत कार्यपद्धती आणि विकासाला चालना देण्यामध्ये नावीन्यपूर्णतेची असलेली परिवर्तनात्मक भूमिका यावर आपले विचार मांडले.कॉंक्रिट क्षेत्रातील भारतातील या एकमेव सर्वसमावेशक प्रदर्शनात यंदा ३५० हून अधिक आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत ब्रँड्स आणि १८,००० हून अधिक व्यावसायिक सहभागी होण्याची अपेक्षा आहे. खर्च, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानाचा अवलंब यांसारख्या प्रमुख आव्हानांना तोंड देण्यासाठी उद्योग आणि सरकार यांच्यात अधिक मजबूत सहकार्याची गरज अधोरेखित करताना, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया (BAI), पुणे चे राज्य सचिव श्री. मनोज देशमुख म्हणाले, "भारतातील बांधकाम उद्योगाला तंत्रज्ञानाचा अवलंब आणि वाढता खर्च यापासून ते कामगारांशी संबंधित बदल, कौशल्यातील तफावत आणि पैशांच्या देयकातील विलंब अशा अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. जरी आपण 'कंत्राटदार'कडून 'रचनाकार' म्हणून विकसित झालो असलो, तरीही हे क्षेत्र मानवी श्रमावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे आणि यामुळे कौशल्य विकास, अभियंत्यांना वैधानिक मान्यता आणि उद्योग-सरकार यांच्यातील मजबूत संवाद अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या आव्हानांना न जुमानता, भारतीय बांधकाम व्यावसायिकांनी स्थानिक मनुष्यबळाच्या मदतीने वेळेत प्रकल्प पूर्ण केले आहेत." भारतातील, विशेषतः पश्चिम भारत आणि उदयोन्मुख टियर २ आणि टियर ३ शहरांमधील बांधकामाच्या भक्कम गतीवर भाष्य करताना, १लॅटिस चे वरिष्ठ संचालक, श्री. सुयोग केळुस्कर म्हणाले, "भारताच्या बांधकाम क्षेत्रात मोठी वाढ होत असून, आर्थिक वर्ष २०२६ मध्ये सिमेंटचे उत्पादन ४९० दशलक्ष टनांच्या आसपास असण्याची अपेक्षा आहे, ज्यात वार्षिक ८-९% वाढ नोंदवली जाईल. २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात सरकारने केलेल्या ₹१२.२ लाख कोटींच्या विक्रमी भांडवली खर्चाच्या तरतुदीमुळे महामार्ग, रेल्वे, लॉजिस्टिक आणि प्रादेशिक पायाभूत सुविधांच्या विकासाला आणखी चालना मिळत आहे. १ कोटी नवीन घरे निर्माण करण्याचे उद्दिष्ट असलेला प्रधानमंत्री आवास योजना अर्बन २.० आणि शहर आर्थिक क्षेत्रांचा विकास यांसारखे उपक्रम टियर १ शहरांच्या पलीकडे विकासाला गती देत आहेत. पश्चिम भारत, विशेषतः मुंबई आणि पुणे, एक प्रमुख विकास क्षेत्र बनून राहिले आहे. टियर २ आणि टियर ३ शहरे विकासाची पुढची केंद्रे बनत असताना, टिकाऊ, शाश्वत आणि हवामान-लवचिक पायाभूत सुविधा उभारण्यात कॉंक्रिट, बांधकाम रसायने आणि नवीन युगातील तंत्रज्ञान अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतील." इन्फॉर्मा मार्केट्स इन इंडियाचे वरिष्ठ गट संचालक श्री. रजनीश खट्टर म्हणाले, "वर्ल्ड ऑफ कॉंक्रिट इंडिया एक्स्पो २०२६ हे एक असे व्यासपीठ आहे जिथे उद्योग नेतृत्व, नावीन्य आणि कृती करण्यायोग्य अंतर्दृष्टी बांधकामाचे भविष्य घडवण्यासाठी एकत्र येतात. या व्यासपीठावरून समोर येणाऱ्या केंद्रित औद्योगिक चर्चा आणि ज्ञान-आधारित अंतर्दृष्टीच्या माध्यमातून, हा कार्यक्रम भागधारकांना आव्हानांचा चांगल्या प्रकारे सामना करण्यास, प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास आणि अधिक कार्यक्षम व शाश्वत बांधकाम पद्धती चालविण्यास सक्षम करेल."